रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड गुरुवार । दि. २४ सप्टेंबर २०२६ । अंक १०९ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

### मिनीट्रेनच्या मार्गात दरड कोसळली



**नेरळ :** पर्यटकांची लाडकी मिनीट्रेन सध्या पावसाळी विश्रांती घेत आहे. या मिनीट्रेनचा पावसाळी सुट्टीनंतरचा हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरु होत आहे. मात्र, पावसाळी असलेल्या या मार्गावर अचानक झालेल्या मुसळधार पावसामुळे दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. मिनीट्रेनच्या मार्गावर दरडी कोसळण्याच्या पान २ वर

### रायगडावर आठ दिवसांपासून अंधार

**महाड :** स्वराज्याची राजधानी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारा आणि शिवराज्याभिषेकाचा ऐतिहासिक सोहळा अनुभवलेला किल्ले रायगड सध्या प्रशासनाच्या बेफिकिरीमुळे अंधारात बुडाला आहे. रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांची शिवसमाधी, मेघडंबरी आणि राजसदर परिसर गेल्या तब्बल आठ दिवसांपासून अंधारात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. ऐतिहासिक वारशाच्या ठिकाणी सलग आठ दिवस प्रकाश व्यवस्था बंद असूनही संबंधित यंत्रणेकडून दखल घेतली जात नसल्याने शिवभक्तांमध्ये पान २ वर

## महिला शिक्षिकेच्या बदलीसाठी मागितली दीड लाखांची लाच । रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

# जि.प. अध्यक्षांचा स्वीय सचिव लाचखोर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या महिला शिक्षिकेच्या बदलीसाठी दीड लाख रुपयांची लाच घेणे जिल्हा परिषद अध्यक्षांच्या स्वीय सचिवाला महागात पडले. रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (दि.२३) सायंकाळी एका खासगी हॉटेलमध्ये लाच घेताना त्याला रंगेहाथ पकडले. या कारवाईने जिल्हा परिषदेच्या पारदर्शक कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केला जात असून, या घटनेनंतर रायगड जिल्हा परिषदेत खळबळ उडाली आहे. या कारवाईने टेबलावर आणि टेबलाखालून अर्थपूर्ण कार्यवाही करणाऱ्या वरिष्ठांचा वरदहस्त असणाऱ्या छुप्या रूस्तमांना दणका मिळाला आहे.



### ‘ती’ चूक करणारा हाच स्वीय सचिव?

रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजामध्ये प्रशासकीय राजवट असताना कोणताही हस्तक्षेप होताना दिसला नाही. परंतु, लोकप्रतिनिधींनी सूत्रे हातात घेतली आणि जिल्हा परिषदेमध्ये सारे आलबेल सुरु झाल्याचे चित्र आहे. पत्रकारांना माहिती देण्यासाठी मनाई करण्याचे आदेशदेखील काढण्यात आले. या निर्णयावर टीकेची झोड उठल्यानंतर पत्रकारांना माहिती देण्यासाठीची कवाडे जिल्हा परिषद अध्यक्षांनी खुली केली. पण, ते करताना माझ्या स्वीय सचिवांकडून ही चूक झाल्याची कबुली वाट वाकडी करीत जिल्हा परिषद अध्यक्षांनी दिली होती. ही चूक करणारे स्वीय सचिव हेच महाशय असणार, अशी चर्चा जिल्हा परिषदेच्या प्रांगणात सुरु होती.

### लाच नेमकी कोणासाठी?

रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे स्वीय सचिव योगेश भस्मे यांना दीड लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. एका महिला शिक्षिकेच्या बदलीसाठी ही लाच मागितली होती. परंतु, ही लाच नक्की कोणासाठी मागितली, असा प्रश्न जनतेकडून उपस्थित केला जात आहे. यामागील खरा सूत्रधार कोण, असा सवाल चर्चेतून निर्माण झाला आहे.

### सापळ्यामागे खूप काही

पारदर्शक कारभाराचा डंका पिटणाऱ्या भारतीय जनता पार्टीचा रायगड जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्ष आहे. जिल्हा परिषदेची सत्ता तीन पक्षांच्या हाती असली तरी भाजपचे पदाधिकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर आपला वाचक ठेवून आहेत. विकासात्मक कामांचा मागोवा घेताना कामांचे प्रस्ताव आणि बिलांच्या फाईल अध्यक्षांच्या टेबलावरून खाली येतात, अशी चर्चा जिल्हा परिषदेमध्ये आहे. कामे वाटप आणि बिलांच्या फाईल अडकवल्याच्या रागातूनच ही कारवाई झाली असून, या सापळ्यामागे खूप काही दडले असल्याचे पोलीस तपासात उघड होण्याची शक्यता आहे.

### भस्मेची ढवळाढवळ

शिक्षण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या बदलीसाठी जिल्हा परिषद अध्यक्षांच्या स्वीय सचिवांची गरज का भासली, असा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. अर्थ विभागात काम करणारा भस्मे अध्यक्षांचा पीए झाल्यानंतर शिक्षण विभागात ढवळाढवळ करू लागल्याचे हे प्रत्यक्षदर्शी उदाहरण आहे. बदली करण्याचे अधिकार हे शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असणे साहजिक आहे. परंतु, या बदल्यांमध्ये भस्मेची भूमिका संशयास्पद आहे. या भस्मेने मागून स्वीकारलेली लाच नक्की कोणाच्या सांगण्यावरून घेतली, हे तपासामध्ये सिद्ध होईल.

मिळालेल्या माहितीनुसार, योगेश प्रकाश भस्मे (४६) असे या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. रायगड जिल्ह्यातील उरण येथील तो रहिवासी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या अर्थ विभागात सहाय्यक लेखाधिकारी या पदावर कार्यरत आहे. गेल्या काही महिन्यांपासून तो जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्याकडे स्वीय सचिव म्हणून काम करीत आहे. तक्रारदार यांची पत्नी जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षिका आहेत. त्यांच्या बदलीसाठी अर्ज करण्यात आला होता. तक्रारदार यांच्या पत्नीची बदली करून देण्यासाठी योगेश भस्मे यांनी दीड लाख रुपयांची लाच मागितली होती. अखेर तक्रारदाराने रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याप्रकरणी तक्रार दाखल केली. तक्रारीचे गांभीर्य ओळखून लाचलुचपत प्रतिबंधक रायगडच्या उपअधीक्षक सरिता भोसले यांनी कारवाई सुरु केली. लाच मागितल्याची पडताळणी केल्यावर पथक तयार करण्यात आले. उपअधीक्षक सरिता भोसले, पोलीस निरीक्षक निशांत धनावडे, पोलीस उपनिरीक्षक अरुण करकरे, पोलीस पान २ वर

### वेधक

### फटाक्यांवर उच्च न्यायालयाची बंदी

**मुंबई :** गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतानाच ध्वनी आणि हवा प्रदूषणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली आहे. सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यास पूर्णपणे बंदी घालत न्यायालयाने डीजे, हाय-वॉट स्पीकर आणि लेझर लाईट्सच्या अतिवापरावरही तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने स्वतःहून दाखल करून घेतलेल्या जनहित याचिकेवर हे निर्देश दिले. उत्सवाच्या नावाखाली ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवता येणार नाहीत, असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला.

### ‘अल निनो’चा भारताला धोका

**नवी दिल्ली :** प्रशांत महासागरात विकसित होत असलेल्या अल निनोच्या प्रभावामुळे सप्टेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७दरम्यान तीव्र उष्णतेची लाट येण्याचा इशारा देण्यात आला आहे. क्लायमेट इम्पॅक्ट लॅबच्या अहवालानुसार, या कालावधीत जगभरात उष्णतेशी संबंधित सुमारे ४.५१ लाख अतिरिक्त मृत्यू होण्याचा अंदाज आहे. याचा मोठा फटका ग्लोबल साऊथमधील देशांना बसण्याची शक्यता असून, भारतात सुमारे १५,८०० अतिरिक्त मृत्यूंचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, या अहवालामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.

# धरणे फुल्ल, मात्र दुष्काळ कायम!

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

उशीरा दाखल झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक धरणे, पाण्याने भरली. मात्र, गतवर्षीच्या तुलनेने यंदा पाऊस कमी पडल्याचा फटका रायगड जिल्ह्यातील नागरिकांना आतापासून बसू लागला आहे. लघुपाट बंधारे विभागाची २० धरणे फुल्ल आहेत. तरीदेखील पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला असून, अनेक गावे, वाड्यांमध्ये एक ते चार दिवसआड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे धरणे फुल्ल आणि दुष्काळ मात्र कायमच असे चित्र जिल्ह्यात निर्माण झाले आहे.

गतवर्षी पावसाने मे महिन्यातच हजेरी लावली. शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस पडला होता. यंदा मात्र पंधरा दिवस उशिरा पावसाने सुरुवात केली. रायगड जिल्ह्यामध्ये दीर्घ प्रतिक्षेनंतर सोमवारी (दि.२२) जून रोजी पावसाने हजेरी लावली. हा पाऊस जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सलग सुरूच राहिला. त्यामुळे धरणे, नद्या, तलाव पाण्याने तुडूंब भरून गेले. गतवर्षी शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस पडला. रायगडमध्ये यंदा आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ८९.९ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील लघु पाट बंधारे विभागातील २८ धरणांपैकी अलिबागमधील श्रीगांव, श्रीवर्धनमधील कार्ले, रानावली, महाडमधील वरंध, खैरे, तसेच कर्जतमधील साळोख, अवसरे आणि पनवेलमधील पान २ वर

**जिल्ह्यातील अनेक भागात पाणीटंचाईचे संकट**

अलिबाग तालुक्यासह रोहा, मुरूड तालुक्यातील अनेक गावांमध्ये एक ते चार दिवसआड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाणीकपातीचे संकट जिल्ह्यावर आ वासून उभे असल्याचे चित्र आहे. पावसाचा असाच खेळ सुरू राहिल्यास पाणीटंचाई अधिक भीषण होण्याचा धोका आहे.



# ‘एसआयआर’वरून शेकापचा हल्लाबोल

- **मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांनी राजीनामा द्यावा**
- **जयंत पाटील यांची जोरदार मागणी**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकशाहीचे रक्षण करायचे सोडून स्वायत्तता वेशीवर टांगणाऱ्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी जोरादार मागणी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांनी केली आहे. खुद्द निवडणूक आयोगातील सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी दोन आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर दहा महिन्यांत तब्बल १४ वेळा अधिकृत आक्षेप नोंदवल्याच्या वृत्ताने निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचा हल्लाबोल पाटील यांनी केला.

आपलं इमान विकून निवडणूक आयोगाचा झालेला विचका सर्वश्रुत आहे. ज्यांनी लोकशाहीचं रक्षण करायचं, त्यांनीच स्वायत्तता वेशीवर टांगली, असा घणाघात करत जयंत पाटील यांनी आयोगाच्या कारभारावर सवाल उपस्थित केला. मुख्य निवडणूक आयुक्त आणि अन्य दोन आयुक्तांची घटनात्मक श्रेणी समान असताना एकाधिकारशाही पद्धतीने कारभार चालविला जात असेल, तर ही बाब लोकशाहीसाठी गंभीर असल्याचे शेकापने म्हटले आहे. मतदार याद्यांची सत्यता, निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि आयोगाची स्वायत्तता अबाधित ठेवण्यासाठी ज्ञानेश कुमार यांनी पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली.

ज्यांनी लोकशाहीचे रक्षण करायचे, त्यांनीच स्वायत्तता वेशीवर टांगली तर लोकशाहीने दाद मागायची कुणाकडे? असा सवाल जयंत पाटील यांनी उपस्थित केला आहे. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असून, तिच्या कारभारात पारदर्शकता आणि सामूहिक निर्णयप्रक्रिया असणे अपेक्षित आहे. मात्र, दोन आयुक्तांनीच वारंवार आक्षेप नोंदविणे आणि कॅबिनेट सचिवांकडे धाव घेणे ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे. पान २ वर

# रायगडचे निलेश पाटील महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी

**इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर फेडरेशनच्या ३२ जिल्ह्यांची धुरा**



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागचे निलेश पाटील यांची फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन, महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. सलग तिसऱ्यांदा इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनमध्ये बिनविरोध निवडून येत त्यांनी संघटनात्मक कार्याची छाप निर्माण केली असून, आता राज्यातील ३२ जिल्हा संघटनांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पाटील यांच्या निवडीने इलेक्ट्रिकल क्षेत्रात रायगडचा झेंडा राज्यपातळीवर पान २ वर

### खैर द्रवाची ४३५ ड्रमची तस्करी



**। रोहा । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरून खैर लाकडापासून तयार केलेला ‘खैर द्रव’ तब्बल ४३५ ड्रममधून विनापास वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले असून, वनखात्याने केलेल्या कारवाईत ट्रकसह सुमारे ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात उत्तर प्रदेशातील दोन जणांना अटक करण्यात आली. वनखात्याने खैर तस्करीच्या मोठ्या साखळीचा संशय व्यक्त केला आहे. वनपरिमंडळ अधिकारी पान २ वर

कृषीवल

वात्सल्यमूर्ती



सुलभा (काकू) पाटील

जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

आपण दिलेल्या संस्कारांवरती, तुम्ही दाखविलेल्या वाटेवरती..
आम्ही अविरत चालतो आहोत...
तुमचा आशीर्वाद नेहमीच सत्कार्यास बळ देईल..

**प्रशांत नाईक यांच्या हस्ते पहिल्या बाईकची विक्री । नितीन पेडणेकर ठरले पहिले ग्राहक**

# नमिता मोटर्सच्या ‘ट्रायम्फ’ शोरूमचा शुभारंभ

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथे नमिता मोटर्सच्या ट्रायम्फ दुचाकी शोरूमचा शुभारंभ बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी उत्साहात करण्यात आला. प्रीमियम मोटारसायकलींसाठी जगभरात ओळख असलेल्या ट्रायम्फ या ब्रिटिश ब्रँडचे अधिकृत शोरूम अलिबागमध्ये सुरू झाल्याने रायगडमधील दुचाकीप्रेमींसाठी आणखी एक पर्याय उपलब्ध झाला आहे. शोरूमचा शुभारंभ माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.




यावेळी त्यांच्या हस्ते ट्रायम्फच्या पहिल्या दुचाकीची विक्री करण्यात आली. अलिबाग तालुक्यातील वडगाव फाटा येथील नितीन पेडणेकर यांनी पहिली दुचाकी खरेदी करण्याचा मान मिळवला. प्रशांत नाईक यांच्या हस्ते पेडणेकर यांना दुचाकीची चावी सुपूर्द करण्यात आली.

ट्रायम्फ हा ब्रिटनमधील ऐतिहासिक आणि प्रीमियम मोटरसायकल ब्रँड असून, आकर्षक रचना, दमदार कामगिरी आणि आधुनिक तंत्रज्ञानासाठी तो जगभरात ओळखला जातो. पारंपरिक ब्रिटिश मोटारसायकल वारसा आणि आधुनिक रायडिंग अनुभव यांचा संगम ट्रायम्फच्या विविध मॉडेल्समध्ये पाहायला मिळतो. भारतातील प्रीमियम मोटारसायकल बाजारपेठेतही या ब्रँडने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

नमिता मोटर्सच्या अलिबाग येथील शोरूममध्ये ग्राहकांना ट्रायम्फच्या विविध श्रेणीतील मोटारसायकली उपलब्ध पान २ वर

# कांदळवनाची कत्तल अन् टॉवरचे जंगल

## पर्यावरण रक्षणाच्या घोषणांचा दिखावा?



| उरण | प्रतिनिधी |

एकीकडे पर्यावरण वाचवा, कांदळवन जपा, झाडे लावा असा उपदेश शासनाकडून केला जात असताना, दुसरीकडे उरण तालुक्यात कांदळवनाची कथित कत्तल, भराव आणि झाडांची तोड करून बांधकामे उभी राहात असल्याच्या तक्रारींनी प्रशासनाच्या पर्यावरण संवर्धनाच्या भूमिकेवर प्रश्न निर्माण झाला आहे.

उरण तालुक्यातील काही ग्रामपंचायत हद्दींमध्ये समुद्रकिनारी असलेल्या खारफुटीची कथित तोड करून मोठ्या प्रमाणात भराव करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. या भरावानंतर बांधकामे उभी राहत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कांदळवन हे किनारपट्टीचे नैसर्गिक संरक्षण कवच असताना त्याच्यावर घाव घातला जात असेल, तर भविष्यातील पर्यावरणीय संकटाची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल उपस्थित होत आहे. दुसरीकडे उरण नगरपालिका हद्दीत झाडांची तोड करून टॉवर उभारले जात असल्याच्या तक्रारीही आहेत. हिरवाई कमी होत असताना काँक्रीटचे जंगल मात्र वाढत असल्याचे चित्र आहे. विकासाच्या नावाखाली झाडे तोडायची आणि मोकळ्या जागांवर टॉवर उभे करायचे, तर पर्यावरण संवर्धनाचे धडे केवळ सामान्य नागरिकांनीच घ्यायचे का, असा संतप्त सवाल उरणकरांकडून होत आहे. गणेशोत्सवात कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जन करा, पर्यावरण वाचवा असे आवाहन करणाऱ्या प्रशासनाने उरणच्या कांदळवन आणि हिरवाईच्या रक्षणासाठीही तितकीच कठोर भूमिका घ्यावी. उरणची कांदळवने, हिरवाई आणि समुद्रकिनारा हा बेकायदा भराव आणि बांधकामांसाठी मोकळा भूभाग नाही. त्यामुळे संवेदनशील भागांची तातडीने संयुक्त पाहणी करून कथित अनधिकृत कामांची चौकशी करावी, वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

पान १ वरुन

## जि.प. अध्यक्षांचा स्वीय सचिव लाचखोर

हवालदार परम ठाकूर, नवदीप नांदगावकर आदीच्या पथकाने बुधवारी (दि.२३)सायंकाळी सापळा रचला. अलिबागमधील एका हॉटेलमध्ये दीड लाख रुपयांची लाच घेताना योगेश भस्मे याला रंगेहाथ पकडण्यात आले. या कारवाईमुळे जिल्हा परिषदेमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईनंतर जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामकाजातील पारदर्शकतेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे.

**लाचखोराच्या दिमतीला कर्मचाऱ्यांचा तांडा**

लाचलुचपत विभागाने सापळा रचून रायगड जिल्हा परिषद अध्यक्षांच्या स्वीय सचिव म्हणून कार्यरत असणाऱ्या योगेश भस्मेला लाच घेताना अटक केली. त्याला एका हॉटेलमधून ताब्यात घेत जिल्हा परिषदेमधील अध्यक्षांच्या कार्यालयात आणले होते. त्यानंतर त्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पिंपळभाट येथील कार्यालयात चौकशीसाठी आणण्यात आले. त्याठिकाणी चौकशीसाठी आणल्यानंतर रायगड जिल्हा परिषदेमधील कर्मचाऱ्यांचा तांडा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयाबाहेर त्याच्या दिमतीला उभा असलेला दिसला.

**उपअधीक्षकांकडून आवाहन**

शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच अन्य एजंटद्वारे लाचेची मागणी करणाऱ्यांविरोधात रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात यावी. कोणी आढळून आल्यास कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या उपअधीक्षक सरिता भोसले यांनी केले.

## रायगडावर आठ दिवसांपासून अंधार

तीव्र संताप व्यक्त होत आहे.

स्थानिक पातळीवर मिळालेल्या माहितीनुसार, महावितरणची वीज मीटरपर्यंत उपलब्ध आहे. मात्र, मीटरनंतर जाणाऱ्या वीजपुरवठ्याच्या अंतर्गत लाईनमध्ये बिघाड झाल्याने शिवसमाधीसह परिसरातील दिवे बंद असल्याचे स्थानिक लाईनमनशी संपर्क साधल्यानंतर स्पष्ट झाले. मीटरनंतरची अंतर्गत विद्युत व्यवस्था तपासणे आणि बिघाड दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित पुरातत्व विभागाची असल्याचे सांगण्यात येत आहे.

किल्ले रायगड परिसरातील हॉटेल चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष रघुवीर देशमुख यांनी सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट करून या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधले. त्यानंतर रायगडाच्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी असलेल्या पुरातत्व विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शिवसमाधीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील ठिकाणी सलग आठ दिवस अंधार असताना त्याची दखल घेणारे अधिकारी कुठे आहेत? किल्ले रायगडाला वाली कोण? असा संतप्त सवाल आता शिवप्रेमींकडून केला जात आहे. पुरातत्व विभागाने तातडीने वीजपुरवठ्यातील बिघाड शोधून प्रकाश व्यवस्था पूर्ववत करावी, तसेच रायगडावर जबाबदार अधिकाऱ्यांची नियमित उपस्थिती सुनिश्चित करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.दरम्यान, पुरातत्व विभागाचे अधिकारी संकेत कववकर यांच्याशी संपर्क साधण्याचे वारंवार प्रयत्न करण्यात आले. मात्र त्यांनी फोन न उचलल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

## मिनीट्रेनच्या मार्गात दरड कोसळली

घटना घडल्याने रेल्वे मार्गावर पुन्हा एकदा दुरुस्तीची कामे करावी लागणार आहेत. ब्रिटिश काळात सुरु झालेली नेरळ माथेरान मिनीट्रेन ब्रिटिश काळापासून पावसाळ्यात माथेरान डोंगरात होणारा पाऊस आणि त्यामुळे दरडी कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक बंद असते. दुसरीकडे जूनपासून १५ ऑक्टोबर या कालावधीत मिनीट्रेन मार्गावर दुरुस्तीची कामे रेल्वे कडून केली जात असतात.पावसाळ्यात माथेरान असलेल्या घनदाट अरण्य यामुळे ५०००मिली पाऊस पडत असतो.त्यामुळे घाटात मोठ्या दरडी कोसळून मिनीट्रेन मार्ग आणि नेरळ माथेरान घाटरोड यांचे नुकसान होत असते. यावर्षी गेली तीन महिने मिनीट्रेन मार्गावर दुरुस्तीची कामे वेगाने पूर्ण करण्यात आली होती. परंतु, मागील काही दिवस गायब झालेला पाऊस काल अचानक कोसळला आहे. या पावसाने मोठे नुकसान माथेरान घाटात मिनीट्रेन मार्गावर झाले आहे.

मिनीट्रेनच्या नेरळ माथेरान नॅरोगेज १४२ या वळणावर मोठ्या प्रमाणात डोंगरातील माती आणि दगड कोसळून मिनीट्रेन मार्गावर पडले आहेत. त्या ठिकाणी मातीसोबत एक भाला मोठा दगड मिनीट्रेन मार्गावर येऊन थांबला आहे. या दगडांमुळे रेल्वे कामगारांना कसरत करावी लागणार असून, हा दगड नॅरोगेज मार्गावर बाजूला करण्याचे काम रेल्वे कर्मचारी करीत आहेत. त्यासाठी मिनीट्रेन मार्गावर नेरळ येथून मालवाहू गाडी सोडली जात आहे. दगड बाजूला करून नॅरोगेज मार्ग सुस्थितीत करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्य नेण्यासाठी या मालवाहू गाडीमधून साहित्याची ने आन सुरु आहे.

## 'एसआयआर'वरून शेकापचा हल्लाबोल

जर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा कारभार इतका निष्पक्ष असेल, तर त्यांच्याच सहकाऱ्यांना वारंवार आक्षेप का नोंदवावे लागले? लोकशाहीच्या मंदिराची विश्वासार्हता धुळीला मिळत असेल, तर खुर्चीला चिकटून बसण्याऐवजी ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली.

## धरणे फुल्ल, मात्र दुष्काळ कायम!

बामणोली या धरणांमध्ये ५२ ते ९९ टक्के जलसाठा शिल्लक आहे. उर्वरित २० धरणांमध्ये शंभर टक्के पाणी असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. मात्र, सप्टेंबरमध्ये पावसाची स्थिती चिंताजनक आहे. तीन आठवडे उलटूनही या महिन्याच्या सरासरीच्या केवळ ५६.६ टक्के पाऊस झाला आहे. सप्टेंबरचे अवघे सहा दिवस शिल्लक असल्याने या महिन्यात पावसाची तूट राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याची समस्या भीषण होण्याची चिंता जिल्ह्यातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. परंतु, ऑगस्ट महिन्याबरोबरच सप्टेंबरमध्येही पंधरा दिवस उलटूनही अपेक्षित पाऊस पडला नाही. त्यामुळे पाण्याने फुल्ल भरलेल्या धरणांसह नदी, तलावमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. गावागावात पाण्याचा दुष्काळ सुरु झाला आहे. अलिबाग तालुक्यासह रोहा, मुरूड तालुक्यातील अनेक गावांमध्ये एक ते चार दिवसआड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाणीकपातीचे संकट जिल्ह्यात सुरु झाल्याचे चित्र समोर आले आहे.

## खैर द्रवाची ४३५ ड्रमची तस्करी

कोलाड यांच्या रिमांड रिपोर्टनुसार ३ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजता वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड पुलाजवळ रात्रीची गस्त घालत होते. त्यावेळी भिरा-कोलाड फाट्यावर मुंबईच्या दिशेने जाणारा यूपी ७७/एटी ५४५० क्रमांकाचा टाटा ट्रक अडवून तपासणी करण्यात आली. ट्रकमध्ये खैर लाकडापासून तयार केलेले ४३५ ड्रम खैर द्रव, अंदाजे २९ टन वजनाचे आढळून आले.

वनखात्याने तक्रारीमध्ये या मालाची अंदाजे किंमत २८ लाख रुपये, तर ट्रकची किंमत २० लाख रुपये अशी नमूद असून, जप्त मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत ४८ लाख रुपये असल्याचे रिमांड रिपोर्टमध्ये नमूद आहे.

याप्रकरणी ट्रक चालक इकरार वहिद बेग (३५) आणि रहिम शामीर बेग (४०), दोघेही उत्तर प्रदेशातील रहिवासी यांना अटक करण्यात आली. जप्त केलेल्या मालाचे मालक म्हणून विशाल मालवणकर यांचा उल्लेख रिमांड रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. हा माल नेमका कुठून आला, त्यासाठी आवश्यक परवाने होते का आणि तो शासकीय जंगलातील खैरापासून तयार करण्यात आला आहे का? याचा तपास वनखात्याने सुरू केला आहे.

वनखात्याने तस्करी होत असलेल्या खैर लाकडापासून तयार केलेल्या द्रवपदार्थाची अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार करणे अत्यंत आवश्यक आहे. जर हा पदार्थ अन्नपदार्थ, पानमसाला किंवा औषधांमध्ये वापरला जात असेल किंवा तो मानवी आरोग्यासाठी घातक आणि असुरक्षित असेल, तर महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन यावर कडक कारवाई करू शकते.

– नितीन परब, अध्यक्ष, रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट

## रायगडचे निलेश पाटील महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी

फडकला आहे. इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरच्या विविध प्रश्नांसाठी संघटनात्मक पातळीवर सातत्याने काम करणाऱ्या निलेश पाटील यांच्या निवडीमुळे रायगडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. राज्यातील ३२ जिल्ह्यांतील इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर संघटनांना एकत्रितपणे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. या निवडीबद्दल रायगडसह महाराष्ट्रातील इलेक्ट्रिकल क्षेत्रातून निलेश पाटील यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या नेतृत्वातून इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरच्या प्रश्नांना राज्यपातळीवर प्रभावी व्यासपीठ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. निलेश पाटील यांना सर्व स्तरातून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## नमिता मोटर्सच्या 'ट्रायम्फ' शोरूमचा शुभारंभ

होणार आहेत. यामध्ये स्पीड टी, स्पीड ४००, स्क्रॅम्बलर ४०० एक्स, स्क्रॅम्बलर ४०० एक्ससी, थ्रक्स्टन आणि ट्रॅकर ४०० या मॉडेल्सचा समावेश आहे. शोरूममध्ये उपलब्ध मॉडेल्सच्या दर्शविलेल्या एक्स-शोरूम किमतीनुसार, स्पीड टीची किंमत २ लाख ८ हजार ९७१ रुपये, स्पीड ४००ची २ लाख ३४ हजार १३९ रुपये, स्क्रॅम्बलर ४०० एक्सची २ लाख ६४ हजार ९७८ रुपये, तर स्क्रॅम्बलर ४०० एक्ससीची किंमत २ लाख ९९ हजार ३३३ रुपये आहे. थ्रक्स्टनची किंमत २ लाख ७५ हजार ३३५ रुपये, तर ट्रॅकर ४००ची किंमत २ लाख ४१ हजार ८८२ रुपये आहे. अलिबागमध्ये ट्रायम्फचे शोरूम सुरू झाल्याने रायगड जिल्ह्यातील ग्राहकांना प्रीमियम मोटारसायकलींची खरेदी आणि संबंधित सेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. अलिबागसह पेण, मुरुड, रोहा आणि परिसरातील मोटारसायकलप्रेमींनाही या शोरूमचा लाभ घेता येणार आहे. शोरूमच्या शुभारंभानिमित्त दुचाकीप्रेमी, ग्राहक, व्यावसायिक आणि नागरिकांनी उपस्थित राहून नमिता मोटर्सच्या या नव्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल प्रियेश लॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि.या कंपनीच्या मालकी हक्कात असलेली मौजे महलमिरा येथील, सर्व्हे नं. ३२२, ३२४, ३२६/२, ८६/२, ३५५, ३५३, ३५१, ३४३, ३४२, ३१२, ३४९, ३६६ व ३३२ अशा वर्णनाच्या जमिन मिळकती बाबत कोणत्याही इसमाने अगर संस्थेने कोणत्याही प्रकारचा कायदेशीर वारस, गहाण, दान, बक्षीस, न्यायालयाची, जप्ती, वहिवाट, भाडेपट्टा, वहिवाट ताबे कब्जा व साठेकरार, खरेदीखत, कुलअखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचे दस्त अगर कोणत्याही प्रकारचे व्यवहार करू नये. तसे करण्यास माझ्या अशिलांची पुर्णपणे हरकत आहे. सदर मिळकती बाबत कोणतेही व्यवहार झाल्यास व त्यानंतर कोणतीही कायदेशीर बाब निर्माण झाल्यास त्यास प्रियेश लॅण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. जाबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक

**ॲड. विधिती जयेश म्हात्रे.**
दुर्वांकूर, चिंचपाडा, ता.पेण,
जिल्हा रायगड.
मोबाईल :८७९३७५५१०५

### माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, उतेखोल माणगांव- रायगड

**अठ्ठाविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांसाठी)**

मा.श्री./सौ.

माणगांव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल, ता. माणगांव या संस्थेच्या भागधारकांची अठ्ठावीसाठी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.आनंद शिवराम यादव यांचे अध्यक्षतेखाली शनिवार दिनांक २६/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता चौधरी कॉम्प्लेक्स, निजामपूर रोड, माणगांव जि.रायगड येथे घेण्यात येणार आहे. तरी आपण सर्वांनी सभेकरीता वेळेवर उपस्थीत राहून सहकार्य द्यावे हि विनंती.

**सभेपुढील कामे**

१) दिनांक १२/०९/२०२६ रोजी झालेल्या सत्तावीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे लिखीत इतिवृत्त वाचून मंजुर करणे,
२) संचालक मंडळाने सादर केलेले ३१ मार्च २०२६ अखेरचे संस्थेचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व वार्षिक अहवाल वाचून मंजुरी देणे.
३) सन २०२५-२०२६ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचून मंजुर करणे.
४) सन २०२५-२०२६ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
५) सन २०२६-२०२७ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) संस्थेच्या संचालक व त्यांचे नातेवाईकांस दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७) सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता निबंधकांनी जाहिर केलेल्या पॅनलमधिल पात्र वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.
८) तक्रार व तडजोड समिती स्थापन करणे.
९) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

दिनांक : १२/०९/२०२६
ठिकाण: उतेखोल माणगांव

संचालक मंडळाचे अनुज्ञेने
**पुंडलिक तु.गायकवाड**
व्यवस्थापक
माणगांव ग्रामीण बिगरशेती सह.
पतसंस्था मर्यादित, उतेखोल माणगांव

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, गणपत गोसावी पाटील यांच्या ताबेकब्जातील, वहीवाटीतील, त्यांच्या मालकी हक्कात असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करणेचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोर्बे, तहसिल पनवेल, जिल्हा रायगड येथील**

| गट क्र. | उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.चौ.मी. | क्षेत्र पोट खराबा हे.आर.चौ.मी. | क्षेत्र एकूण हे.आर.चौ.मी. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १५ | २ | ०-४३-९० | ०-१५-१० | ०-५९-०० | ४.१२ |

वरील वर्णनाच्या जमीनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहीवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/०९/२०२६

**ॲड.अतुल तुकाराम भोपी**
कार्यालय:-१०४, साई लिला, माणेक नगर को-ऑप.
हौ.सोसायटी समोर, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०६.
मो.नं. ९३२४६७९५०७

### जाहीर नोटीस

प्रो.जा.२५३/२०२६
ॲड. नरेश रामदास अहिर.
नि-८/ड
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१४४/२०२६.

**कर्जत येथील मा.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

पु. ता. १४/१०/२०२६

१)श्रीम.हेमलता राजु भवर, वय ५८ वर्षे,
२)श्री.तेजस राजु भवर, वय - ४० वर्षे,
३)श्री.विक्रांत राजु भवर, वय ३७ वर्षे,
क्र. १ ते ३ रा. फ्लॅट नं. १०५, पहीला मजला, — अर्जदार
साई तुलसी लिली बिल्डींग, राजेंद्रगुरू नगर,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०१०१.
४)श्रीम.राजश्री पांडुरंग जाधव, वय-३५ वर्षे,
रा.भोई आली, शिवाजी चौक, जांभुळ, बदलापुर,
ता.अंबरनाथ, जि.ठाणे- ४२१३०१.

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्या अर्थी श्रीम.हेमलता राजु भवर वगैरे ३ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी चौ.अर्ज क्र.१४४/२०२६ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार क्र. १ यांचे पति व क्र.२ ते ४ यांचे वडील कै.राजु सिताराम भवर हे मौजे. नेरळ, राजेंद्रगुरूनगर, ता. कर्जत, जि.रायगड येथील रहिवासी असून ते दिनांक ०६/०७/२०१० रोजी मौजे नेरळ, राजेंद्रगुरूनगर, ता. कर्जत, जि.रायगड येथे मयत झालेले असून अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत असे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे.

कै. राजु सिताराम भवर यांचे मृत्युपश्च्यात अर्जदार हे त्यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणे गरजेचे आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारांना वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित व इतर यांची काही हरकत असल्यास त्यांनी कागदपत्रांसह तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महीन्याच्या आत दि.१४/१०/२०२६ पुर्वी या न्यायालयात दाखल करावी. जर मुदतीमध्ये कोणतीही हरकत किंवा तक्रार न आल्यास अर्जदारांना त्यांच्या विनंतीनुसार वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस आज दि.२३/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/-
**क.लिपीक**
**दिवाणी न्यायालय, कर्जत**

सही/-
**सहा अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, कर्जत**

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, १. श्री. सिदी शाह मेहमूद खान - सिदी मोहम्मद खान यांचा मुलगा, २. श्रीमती फातिमा बेगम जसदानवाला, ३. कु. नवाबझादी अहमदी बेगम मोहम्मद खान, ४. श्रीमती मुमताज बेगम खान व ५. श्रीमती कमर झमान बेगम खान (येथे विक्रेते म्हणून उल्लेखित) - एक भाग म्हणून आणि श्री. जावीद अबूबकर मर्चंट व श्रीमती नाहीद जावीद मर्चंट (येथे खरेदीदार म्हणून उल्लेखित) - अन्य भाग म्हणून यांच्या दरम्यान सर्व्हे क्र..५३, हिस्सा क्र. १ (पार्ट), मोजमापित ०.१८.७ आर (अर्थात १८८० चौ.मी.) क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गाव काशीद, तालुका मुरूड, जिल्हा रायगड, नोंदणीकरण उपजिल्हा अलीबाग अंतर्गत येथील व सीमा पुढीलप्रमाणे -

दक्षिणेस वा त्या दिशेस : श्री. नवाब साहेब ऑफ जंजिरा व अन्य यांच्या मालकीची सर्व्हे क्र. ५३/१ पार्ट धारक शेतजमीन.
उत्तरेस वा त्या दिशेस : श्री. नवाब साहेब यांच्या मालकीची सर्व्हे क्र. १७ (४) पार्ट धारक शेतजमीन.
पूर्वेस वा त्या दिशेस : श्री. नवाब साहेब यांच्या मालकीची सर्व्हे क्र. १७ (४) पार्ट धारक जमीन.
पश्चिमेस वा त्या दिशेस : अरबी समुद्र

या विवरणाच्या मालमत्तेसंदर्भात (यापुढे सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित)केलेला आणि नोंदणीकरण क्र. ४८२/१९९३ अंतर्गत संयुक्त उपनिबंधक, श्रीवर्धन (एसडीएन) यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ नोंदणीकृत हस्तांतरण दस्तावेज, दि. ३० डिसेंबर, १९९३ हे हरवले/गहाळ झाले आहेत आणि सातत्याने शोध घेऊनही सापडलेले नाहीत.

यासंदर्भात बृहन्मुंबई पोलीस, एल. टी. मार्ग, पोलीस स्टेशन येथे गहाळ अहवाल क्र. १२८५१७ - २०२६, दि. ०८ सप्टेंबर, २०२६ अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्तेसंदर्भात व/वा वरील मूळ दस्तावेजांसंदर्भात कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास किंवा कोणतीही हरकत असल्यास किंवा कोणाही व्यक्तीस वरील मूळ दस्तावेज सापडल्यास वा कोणाच्याही ताब्यात असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात सहाय्यक दस्तावेजांसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत खालील निर्देशित पत्यावर सूचित करावे अन्यथा असा कोणताही वा सर्व दावे अधित्यागित समजण्यात येतील.

दिनांक : २४ सप्टेंबर, २०२६

सही/-
**आशिष टी. सूर्यवंशी**
श्री. जावीद अबूबकर मर्चंट व
श्रीमती नाहीद जावीद मर्चंट यांचे वकील
पत्ता : कक्ष क्र. ८,३ रा मजला, भाग्योदय बिल्डिंग,
७९, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, १. श्री. सिदी शाह मेहमूद खान - सिदी मोहम्मद खान यांचा मुलगा, २. श्रीमती फातिमा बेगम जसदानवाला, ३. कु. नवाबझादी अहमदी बेगम मोहम्मद खान, ४. श्रीमती मुमताज बेगम खान व ५. श्रीमती कमर झमान बेगम खान (येथे विक्रेते म्हणून उल्लेखित)-एक भाग म्हणून आणि श्री.जावीद अबूबकर मर्चंट व श्रीमती नाहीद जावीद मर्चंट (येथे खरेदीदार म्हणून उल्लेखित)-अन्य भाग म्हणून यांच्या दरम्यान सर्व्हे क्र.१७, हिस्सा क्र. ४ (पार्ट), मोजमापित ०.२१.७ आर क्षेत्रफळाच्या शेतजमिनीचा सर्व तो भाग व भूखंड, गाव काशीद, तालुका मुरूड, जिल्हा रायगड, नोंदणीकरण उपजिल्हा अलीबाग अंतर्गत येथील व सीमा पुढीलप्रमाणे -

दक्षिणेस वा त्या दिशेस : श्री.नवाब साहेब ऑफ जंजिरा व अन्य यांच्या मालकीची सर्व्हे क्र. १७ (४) पार्ट धारक शेतजमीन.
उत्तरेस वा त्या दिशेस : श्री. नवाब साहेब यांच्या मालकीची सर्व्हे क्र.१७ (४) पार्ट धारक शेतजमीन.
पूर्वेस वा त्या दिशेस : काशीद मार्गे सलावनपासून मुरूडपर्यंत जाणारा सार्वजनिक रस्ता.
पश्चिमेस वा त्या दिशेस : श्री. नवाब साहेब ऑफ जंजिरा व अन्य यांच्या मालकीची सर्व्हे क्र.५३/१ पार्ट धारक जमीन

या विवरणाच्या मालमत्तेसंदर्भात (यापुढे सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) केलेला आणि नोंदणीकरणक्र. ४८१/१९९३ अंतर्गत संयुक्त उपनिबंधक, श्रीवर्धन (एसडीएन) यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ नोंदणीकृत हस्तांतरण दस्तावेज दि.३० डिसेंबर, १९९३ हे हरवले/गहाळ झाले आहेत आणि सातत्याने शोध घेऊनही सापडलेले नाहीत. यासंदर्भात बृहन्मुंबई पोलीस, एल. टी. मार्ग, पोलीस स्टेशन येथे गहाळ अहवाल क्र. १२८५०२ - २०२६, दि. ०८ सप्टेंबर, २०२६ अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

कोणाही व्यक्तीचा सदर मालमत्तेसंदर्भात व/वा वरील मूळ दस्तावेजांसंदर्भात कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा, हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास किंवा कोणतीही हरकत असल्यास किंवा कोणाही व्यक्तीस वरील मूळ दस्तावेज सापडल्यास वा कोणाच्याही ताब्यात असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात सहाय्यक दस्तावेजांसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत खालील निर्देशित पत्त्यावर सूचित करावे अन्यथा असा कोणताही वा सर्व दावे अधित्यागित समजण्यात येतील.

दिनांक : २४ सप्टेंबर, २०२६

सही/-
**आशिष टी. सूर्यवंशी**
श्री. जावीद अबूबकर मर्चंट व श्रीमती नाहीद जावीद मर्चंट यांचे वकील
पत्ता : कक्ष क्र. ८, ३ रा मजला, भाग्योदय बिल्डिंग, ७९, नगीनदास मास्टर रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

### MAHATRANSCO — E-Quotation No. 03/2026-27

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-enquiry are invited for following works from the registered contractors.

| E-enquiry No. | Name of work |
|---|---|
| 948 Dt. 23.09.2026 | Dismantling of staff quarter (Type II-2nos bldgs, Type III-2nos bldgs, Type IV-2nos bldgs) total 6 buildings, properly removing old serviceable / usable materials, transportation of debris & making the plinth in plane surface with all T&P materials & labours at colony premises of 500kv HVDC RS O&M Circle Padghe. |

For detailed information, please see our website: **www.mahatransco.in. Contact person:** Shri Rahul A. Kale, Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, Panvel, Mobile No. **9594948317.**

**Executive Engineer (Civil),**
**EHV CCCM Division, MSETCL, Panvel**

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.संतोष अशोक पवार यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे भालिवडी, ता.कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २५/४ एकुण ०.१२.६० हेक्टर आर.चौ.मी. मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २४/०९/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.नितीन जयराम धुळे व श्री. सुनिल कुमार यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे अंत्राट तर्फे निड, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३०/१/ब एकुण १.४५.०० मिळकत पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.८०.०० हेक्टर आर असुन सदर मिळकतीमधील ०.२०.०० मिळकत आमचे अशिल विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २४/०९/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता.कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

दि. : २३/०९/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली विद्यमान मालक श्री.जयेश सुधाकर पाटील यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे अशिल यांच्याबरोबर चालु आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| बेलोशी, ता. अलिबाग | २४६ | ०-३६-०० पो.ख. ०-०५-१० एकूण ०-४१-१० | ०.७५ |

वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी ०-२०-५५ हे. आर. या क्षेत्राची मिळकत जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, इतर कोणताही करार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. अमर अशोक घरत,**
मोबा.नं.७७९८९३०७०८, ८८०५०३७४७४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे खिरकिंडीवाडी, तलाठी सजा डोणवत, ता. खालापुर, जि. रायगड येथील खालील व्यक्तीचे नावे असलेले ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची शेतीजमिनी मधील घर मिळकती व मोकळी जागेचे आमचे आशिलांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनी वरील घर मिळकत व मोकळया जागेचे वर्णन**
**मौजे - खिरकिंडीवाडी, (ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी) ता. खालापुर, जि. रायगड**

| कब्जेदाराचे/मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | घर नं. | घराचे क्षेत्रफळ चौ. मी. |
|---|---|---|---|---|
| श्री. संतोष बापु पाटील | १८/६ | ०-३६-०० पो.ख. ०-०१-०० एकुण ०-३७-०० पैकी ०-०३-०० | १५० | आरसीसी बांधकाम सन २०२५ ६२९.८३ चौ.मी. उर्वरीत मोकळी जागा |

सबब वर नमुद शेतीजमिनी मधील घर मिळकती व मोकळया जागे वर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- २४/०९/२०२६

सही/-
**ॲड. प्रताप आर. पाटील,**
शॉप नं. ०१, श्रीगणेश मुरारी,
प्लॉट नं. ३५/१३१, सेक्टर -१०
नविन पनवेल- पूर्व, जि. रायगड
मो. ९३२२०२७७५७

# तरुणाईचा टपरीवरील अन्नाकडे ओढा

- चमचमीत खाद्यपदार्थ असलेल्या स्टॉलवर गर्दी
- घातक सवयीमुळे मुलांचे आरोग्य धोक्यात

| कापोली | प्रतिनिधी |

आजची तरुण पिढी, अगदी लहान मुलांपासून ते महाविद्यालयीन तरुण-तरुणींपर्यंत, आरोग्याकडे साफ दुर्लक्ष करताना दिसत आहेत. घरात आईने प्रेमाने बनवलेले पौष्टिक जेवण नकोसे झाले आहे. गल्लोगल्ली असणाऱ्या चायनीज गाड्या आणि उघड्यावरील टपऱ्यांवर तरुणांची गर्दी उसळत आहे. या घातक सवयीमुळे मुलांचे आरोग्य तर धोक्यात आलेच आहे, पण दिवस-रात्र कष्ट करून पैसा कमावणाऱ्या आई-वडिलांची मानसिक आणि आर्थिक कोंडी होत आहे. आई-वडिलांची मूक व्यथा मुलं जाणून कधी घेणार? त्यांचा सवाल आहे की,आम्ही राबायचं कुणासाठी? दिवसभर उन्हातान्हात कष्ट करून, स्वतः च्या पोटाला चिमटा काढून आम्ही मुलांच्या हातात पैसे देतो. त्यांनी चांगले अन्न खावे, शिकावे म्हणून आमची धडपड असते. पण मुले तोच पैसा चायनीज, थंडपेये आणि आईस्क्रीमवर उडवतात. घरात ताजे अन्न शिजवून आम्ही वाट पाहत असतो, पण मुले बाहेरून पोट भरून येतात, अशी हतबलता अनेक पालकांनी व्यक्त केली आहे.

पालकांच्या खिशाला यामुळे मोठी कात्री लागत आहे. मुले बाहेरचे खाऊन आजारी पडली की, पुन्हा डॉक्टर आणि औषधोपचाराचा आर्थिक भारही याच मध्यमवर्गीय आई-वडिलांना सोसावा लागत आहे.लहान मुलांपासून तरुणांपर्यंत पोटाचे विकार आणि जीव धोक्यात येऊ लागले आहे. लहानपणापासूनच मुलांना बाहेरील चमचमीत खाण्याची चटक लागल्याने त्याचे अत्यंत घातक परिणाम आता समोर येत आहेत. चायनीज पदार्थांमध्ये वापरले जाणारे रासायनिक रंग, 'अजिनोमोटो' (टेस्टिंग पावडर) आणि निकृष्ट दर्जाचे तेल यामुळे पोटाचे आणि आतड्यांचे गंभीर विकार उद्भवत आहेत. यकृत आणि पचनसंस्थेचे कायमचे नुकसान होत आहे. उघड्यावरील अन्नामुळे कावीळ, टायफॉइड आणि गॅस्ट्रोसारखे आजार बळावत आहेत. सततच्या थंडपेयांमुळे (कोल्ड्रिंक्स) आणि आईस्क्रीममुळे लठ्ठपणा आणि मधुमेहाचा धोका तरुण वयातच निर्माण होत आहे.



अन्नाचा थेट संबंध मनाशी आणि बुद्धीशी असतो. बाहेरचे अशुद्ध आणि तेलकट अन्न खाल्ल्यामुळे शरीरात आळस वाढतो.

आजच्या तरुणांना व्यायामाकडे वळायला हवे, मैदानावर घाम गाळायला हवा, पण सकाळी लवकर उठण्याचा आळस त्यांच्या अंगी खिळला आहे. सततच्या आजारपणामुळे आणि शारीरिक अस्वस्थतेमुळे तरुणांचे अभ्यासावरील आणि करिअरवरील लक्ष विचलित होत आहे. याचा थेट परिणाम संपूर्ण कुटुंबाच्या भविष्यावर होत आहे. कान उघडणारे मार्गदर्शन अनेक शिबिराच्या माध्यमातून किंवा व्याख्यानमालेत केले जाते. ते सतत आवाहन करत असतात. ज्या आई-वडिलांनी लहानाचे मोठे केले, त्यांच्या भावनांचा आणि कष्टाचा आदर करायला शिकलं पाहिजे पण तरुणांकडून तसे होताना दिसत नाही.

आळस सोडायला पाहिजे. व्यायाम करायचे विसरुन गेले आहेत. काही मुले थोडे दिवस दंड तपासून पहातात आणि पुन्हा जागेवर येऊन मोबाईलमध्ये मग्न असतात. दिवसातून किमान अर्धा तास स्वतः च्या शरीरासाठी काढायवा हवे. योगासने, धावणे किंवा व्यायाम करा. पैशाची किंमत जाणायला शिका. आई-वडिलांचा पैसा हा फुकट आलेला नाही, तो तुमच्या चांगल्या भविष्यासाठी आहे, आजारपण विकत घेण्यासाठी नाही. थोडक्यात काय तर क्षणभराच्या जिभेच्या सुखासाठी स्वतःचे आरोग्य आणि आई-वडिलांची स्वप्ने पणाला लावू नका. बाहेरचे खाणे बंद करा आणि एक निरोगी, सुजाण नागरिक बनण्याच्या दिशेने पाऊल टाका असे अनेक आई-वडीलांचे म्हणणे आहे.

### घराच्या अन्नाला मान द्या

घराच्या अन्नाला मान द्यायला हवा पण मुलं आपल्याच अविर्भावात आहेत. आईच्या हाताच्या जेवणात जे पोषण आणि प्रेम आहे, ते जगातील कोणत्याही चायनीज स्टॉलवर मिळू शकत नाही. जिभेचे चोचले थांबवायला हवेत. जीभ फक्त काही सेकंदांची चव पाहते, पण त्याचे परिणाम शरीराला वर्षानुवर्षे भोगावे लागतात.

## निवडक

## भुयारी मार्गात वाहनांना प्रवेशबंदी

**खांदा कॉलनी :** पनवेल-बदलापूर मार्गावरील भुयारी मार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाच काही महिन्यांपूर्वी येथे अपघाताची घटना घडली होती. या दुर्घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर प्रशासनाने तातडीने खबरदारीची उपाययोजना करत भुयारी मार्गाच्या ठिकाणी बॅनर लावून नागरिकांना प्रवेश करू नये, असे स्पष्ट केले. भुयारी मार्गाचे काम अद्याप सुरू असून त्याचे अधिकृत लोकार्पणही झालेले नाही. त्यामुळे काम पूर्ण होईपर्यंत या मार्गातून वाहतूक सुरू करू नये, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात आहे. सध्या या भुयारी मार्गातून कोणत्याही वाहनाची ये-जा होत नसल्याचे चित्र आहे.




यापूर्वी काम सुरू असतानाच काही नागरिकांकडून भुयारी मार्गाचा वापर केला जात होता. त्यातूनच सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, अपघातानंतर प्रशासनाने याची गंभीर दखल घेत प्रवेश रोखण्यासाठी बॅनर लावले आहेत. भुयारी मार्गातील उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतरच तो नागरिकांसाठी खुला करण्यात येणार आहे. तोपर्यंत नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून या मार्गात प्रवेश करू नये, असे आवाहन करण्यात येत आहे. लोकार्पणापूर्वीच अपघात टाळण्यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात असून, मार्ग पूर्णपणे सुरक्षित झाल्यानंतरच वाहतुकीसाठी खुला करण्याची भूमिका घेण्यात आली आहे.

## दुकानदाराला मारहाण करून चोरी

**पनवेल :** दुकानात घुसून दुकानदाराला मारहाण करून गल्ल्यातील सहा हजार रुपये जबरदस्तीने घेऊन गेल्याच्या आरोपावरून पनवेल शहर पोलिसांनी इदरीस नियाज शेख याला अटक केली आहे. त्याच्याकडून ३ हजार २०० रुपये रोख आणि रिअलमी कंपनीचा मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल रेल्वे रोडवरील नर्मदा कॉम्प्लेक्ससमोरील दुकानात शंकर रामविलास गुप्ता हे काम करत होते. त्यावेळी इदरीस शेख व त्याचे साथीदार दुकानात आले. त्यांनी गुप्ता यांना शिवीगाळ केली. आयान शेख आणि उबेद यांनी गुप्ता यांना पकडून ठेवले, तर इदरीस याने मारहाण करून दुकानाच्या गल्ल्यातील सहा हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस हवालदार तुषार बोरसे, पोलीस नाईक सम्राट डाकी, अनिल चव्हाण, पोलीस शिपाई दत्ता जाधव, साईनाथ मोकळ, विशाल दुधे व सचिन कोर यांच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेत असताना खास बातमीदाराकडून पोशी साईनाथ मोकळ याना आरोपीची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून इदरीस शेख याला अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या रकमेपैकी ३ हजार २०० रुपये हस्तगत करण्यात आले. पुढील तपास सपोनि अभिजीत पाटील करीत आहेत.

## पनवेलमध्ये ४४.३ टन निर्माल्य संकलित

**खांदाकॉलनी :** गणेशोत्सवाच्या कालावधीत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात यंदा तब्बल २६ हजार ८८ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. दीड दिवस, पाच दिवस, गौरी-गणपती तसेच सात दिवसांच्या गणेशमूर्तींचा यात समावेश आहे.महापालिकेच्या विसर्जन अहवालातून यंदाच्या गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाची संपूर्ण आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये शाडू मातीच्या ७ हजार ७२६ मूर्ती, तर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या १८ हजार ३६२ मूर्तींचे विसर्जन झाले. यंदाच्या गणेशोत्सवात निर्माल्य संकलनावरही विशेष भर देण्यात आला. महापालिका क्षेत्रात तब्बल ४४.३ टन निर्माल्य संकलित करण्यात आले. यामध्ये फुले, हार तसेच अन्य पूजासाहित्याचा समावेश होता. नानासाहेब धर्माधिकारी संस्थेच्या माध्यमातूनही ९.५ टन निर्माल्य संकलित करण्यात आले. नागरिकांनी निर्माल्य थेट तलावात न टाकता उपलब्ध करून देण्यात आलेल्या संकलन केंद्रांमध्ये जमा केले. त्यामुळे जलस्रोतांमध्ये निर्माल्य जाण्याचे प्रमाण कमी करण्यास मदत झाली. दरम्यान, एकूण विसर्जित मूर्तींच्या तुलनेत शाडूच्या मूर्तींची संख्या लक्षणीय असल्याचे आकडेवारीतून दिसून येत आहे. पर्यावरणपूरक गणेशमूर्तींकडे नागरिकांचा वाढता कल असल्याचे यामुळे स्पष्ट होत आहे. मात्र, पीओपीच्या मूर्तींची संख्या अद्यापही मोठी असल्याने आगामी गणेशोत्सवात पर्यावरणपूरक मूर्तींच्या वापराबाबत जनजागृती करण्याचे आव्हान कायम आहे. विसर्जनानंतर महापालिकेच्या माध्यमातून विविध विसर्जनस्थळांवर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नागरिकांच्या सहकार्यामुळे यंदाची विसर्जन प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.



## कोलाड महावितरणाचा मनमानी कारभार

| कोलाड | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील कोलाड (आंबेवाडी) नाक्यावरील महावितरण कंपनीच्या ऑफच्या हाकेच्या अंतरावर असणाऱ्या नथुराम बाबाजी मांगले यांच्या दुकानातील वायर दोन ते तीन ठिकाणी कट झाली असुन याची रीतसर तक्रार दुकानदाराने कोलाड महावितरण ऑफिसमध्ये केली असून ही ती वायर बदलली गेली नाही यामुळे कोणाचा नाहक बळी गेल्यानंतर वायर बदली केली जाईल काय? अशी संतप्त प्रतिक्रिया दुकानदाराकडून व्यक्त करण्यात येत आहे. कोलाड रोहा रस्त्यावरील हॉटेल मराठा समोर तसेच जुन्या व्यापारी बँकेजवळ नथुराम बाबाजी मांगले यांचे जनरल स्टोअर्सचे दुकान असुन या दुकानात विद्युत पोलावरून मिटरमध्ये येणारी वायर खाली लोंबकळत असून ती वायर दोन ते तीन ठिकाणी कट झाली आहे. याची रीतसर तक्रार १ जुलै २०२६ रोजी कोलाड महावितरण कंपनीच्या ऑफिस मध्ये दुकादार नथुराम मांगले यांनी केली याला दोन महिने होऊन गेले तरी ही वायर बदलण्यासाठी महावितरण कंपनीकडून टाळाटाळ केली जात आहे. महावितरण कंपनीचे एक महिन्याचे बिल थकले तर दुसऱ्या महिन्यात लाईट कट केली जाते परंतु पोलावरील वायर कट होऊन दोन महिने झाले तरी कट झालेली वायर बदलली नाही ती अजून तशीच आहे. या दुकानाच्या मागे प्राथमिक आरोग्य केंद्र असून या मार्गाने असंख्य नागरिक येजा करीत असतात यामुळे दुकानदारासहित येजा करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असुन ही कट झालेली वायर त्वरित बदलण्यात यावी अशी मागणी दुकानदार नथुराम मांगले यांच्याकडून करण्यात आली आहे.



## करंजाडेत प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त

**पनवेल :** करंजाडे सेक्टर-५ परिसरात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आल्याने पनवेल शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत एकूण ९२१ पाकिटे असा ६ हजार ८९७ रुपये ५० पैसे किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी रोहित भारत लोकारे यांच्या तक्रारीवरून पवनकुमार ओमप्रकाश मौर्या (३१) ध्यानसिंग पाल (३२), दोघेही रा. करंजाडे, यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील कथित पुरवठादार अमित हा फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, करंजाडे सेक्टर-५ येथील फॅमिली पान शॉप, मेट्रो केमिस्टसमोर तपासणी करण्यात आली. त्यावेळी पवनकुमार मौर्या याच्या ताब्यात विविध प्रकारचा पानमसाला व सुगंधित तंबाखूची ४६८ पाकिटे आढळून आली. या साठ्याची किंमत ३ हजार ५१३ रुपये ५० पैसे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच ध्यानसिंग पाल याच्या ताब्यातून विविध ब्रँडच्या पानमसाला व तंबाखूची ४५३ पाकिटे जप्त करण्यात आली. या साठ्याची किंमत ३ हजार ३८३ रुपये ५० पैसे आहे. दोन्ही ठिकाणच्या कारवाईत एकूण ९२१ पाकिटे जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या पदार्थांची पुढील तपासणी आणि कथित पुरवठादाराचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक सुनील सरगर हे पुढील तपास करीत आहेत.



● मुरुड राजपुरी समुद्रकिनारा सायंकाळी समुद्राजवळील घरे व किनारीवरील बोटी सप्तरंगात मनमोहक दिसतात.

(छायाचित्र : सुधीर नाझरे)

## पेणच्या भोगावती पुलाला राज्यस्तरीय 'उत्कृष्ट पूल' पुरस्कार



| पेण | प्रतिनिधी |

पेण तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरलेल्या तरणखोप-पेण-धावटे मार्गावरील इजिमा क्र. ५६ वरील भोगावती नदीवरील १०० मीटर लांबीच्या उचस्तरीय पुलाची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 'उत्कृष्ट पूल' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यामुळे पेणच्या विकासकामाला राज्यस्तरावर मानाची पावती मिळाली असून, या पुलाच्या बांधकामात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या रामेश्वर कन्स्ट्रक्शन, पेणचे राजूशेठ पिचिका यांच्या दर्जेदार कामाचेही विशेष कौतुक होत आहे.

या पुरस्काराचे वितरण मंगळवार (दि.२९) सप्टेंबर मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या कार्यक्रमात मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

भोगावती नदीवरील हा पूल केवळ वाहतुकीची सुविधा वाढविणारा प्रकल्प नसून, पेण तालुक्यातील विविध गावांना जोडणारा आणि परिसराच्या विकासाला गती देणारा महत्त्वाचा दुवा ठरला आहे.

काम बोलते आणि गुणवत्ता सन्मान मिळवून देते याचा प्रत्यय या पुरस्कारातून आला असून, राजू पिचिका यांच्या नेतृत्वाखाली पेणच्या नावाला राज्याच्या पातळीवर गौरव मिळवून दिला आहे. स्थानिक पातळीवर दर्जेदार बांधकाम करणाऱ्या या संस्थेच्या कामाची राज्य शासनाकडून झालेली दखल ही पेणच्या बांधकाम क्षेत्रासाठीही अभिमानाची बाब मानली जात आहे.

या प्रकल्पात जगदीश सुखदेवे, तत्कालीन अभियंता, दामोदर पाटील, उपविभागीय अभियंता, विनिता जवके, स्थापत्य अभियंता, अनिल भरसाट, शाखा अभियंता यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे योगदान राहिले आहे.

पुरस्कार सोहळ्यात या सर्वांचा गौरव करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०२५-२६ मधील उल्लेखनीय व वैशिष्ट्यपूर्ण बांधकामांसाठी उत्कृष्ट रस्ता, उत्कृष्ट पूल आणि उत्कृष्ट इमारत अशा विविध विभागांत पुरस्कार जाहीर केले आहेत. त्यामध्ये पेण तालुक्यातील तरणखोप येथील भोगावती नदीवरील या पुलाचा समावेश झाल्याने पेणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## डंपरमधील डिझेल लुटल्याप्रकरणी दोघांना अटक

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल जवळील पळस्पे-जेएनपीटी महामार्गावरील नांदगाव येथे डंपरचालकाला चाकू व लोखंडी रॉडचा धाक दाखवून डंपरमधील ३१० लिटर डिझेल लुटल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १६० लिटर डिझेल, सुमारे सात लाख रुपये किमतीची हुंदाई व्हर्ना कार, लोखंडी रॉड आणि प्लास्टिक पाइप असा मुद्देमाल जप्त केला आहे.

डंपरचालकाने नांदगाव येथे डंपर रस्त्याच्या कडेला उभा केला होता. तो लघुशंकेसाठी गेला असता लाल रंगाच्या व्हर्ना कारमधून तसेच राखाडी रंगाच्या आय-१० कारमधून आलेल्या चार जणांनी त्याला चाकू व लोखंडी रॉडचा धाक दाखवला. त्यानंतर डंपरमधील ३१० लिटर डिझेल, सुमारे ३० हजार ३८० रुपये किमतीचे, घेऊन आरोपी पसार झाल्याने या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, तुषार बोरसे, सम्राट डाकी, अनिल चव्हाण, दत्ता जाधव, विशाल दुधे, सचिन कोर आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे राजकुमार माझी, आशिक अन्सारी याला अटक करुन त्यांच्याकडून सात लाख रुपये किमतीची लाल रंगाची हुंदाई व्हर्ना कार जप्त केली.




### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण | गंभीर समस्यामुळे आरोग्य धोक्यात

# आंबा नदीमधून लालसर पाणी

| नागोठणे | प्रतिनिधी |

आंबा नदीमधून लालसर रंगाचे माती मिश्रित पाणी वाहत असल्याची धक्कादायक बाब बुधवारी (दि. २३) सप्टेंबर रोजी सकाळी नागरिकांच्या निदर्शनास आली आहे. अंबा नदीचे संपूर्ण पात्र लाल रंगाच्या पाण्याने व्यापून गेल्याने हे पाणी नक्की कशामुळे आले हा प्रश्न नागरिकांना पडला आहे. तसेच के. टी बंधाऱ्यातून पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांमधूनही हेच पाणी, या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व गावांना वितरित करण्यात येत असल्याने त्या माती मिश्रित पाण्यामुळे सर्व नागरिक, विशेषता महिला त्रस्त झाल्या आहेत.



अंबा नदीच्या वरील भागात गेल्या दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे डोंगरावरून आणि परिसरातून वाहून आलेल्या मातीमिश्रित पाण्यामुळे अंबा नदीतील पाण्याचा रंग पूर्णपणे लालसर झाला असून नदीला एका प्रकारे मैली स्वरूप आले आहे.

अंबा नदीचे हे पाणी कमालीचे दूषित झाले आहे. या प्रदूषित पाण्याचा पुरवठा थेट के. टी. बंधाऱ्यातून जलवाहिन्यांद्वारे संपूर्ण परिसरात होत असल्याने नागरिक तीव्र संताप व चिंता व्यक्त करत आहेत.

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा व त्यावरील भागात मुसळधार पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणावर माती नदीच्या पात्रात वाहून आली. त्यामुळे नदीचे पाणी लाल रंगाचे झाले असल्याची माहिती उपलब्ध होत आहे.

मात्र, असे असले तरी याच के. टी. बंधाऱ्यातून नागोठणे शहर आणि परिसरातील अनेक गावांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, सध्या जलवाहिन्यांतून नागरिकांच्या घराघरांमध्ये लाल रंगाचे, मातीमिश्रित पाणी येत असल्याने लोकांचे हाल होत आहेत.

घरांमधील नळांना येणारे हे पाणी इतके गढूळ आणि घाणेरडे आहे की, ज्या पाण्याकडे साधे डोळे उचलून बघता येत नाही, ते पाणी पिण्यासाठी वापरणे तर दूरच, साधे आंघोळीसाठी किंवा कपडे धुण्यासाठी तरी कसे वापरावे, असा संतप्त प्रश्न स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. या गंभीर समस्येमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, प्रशासनाने तात्काळ पाणी शुद्धीकरण करून स्वच्छ पाणीपुरवठा करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# नियोजनाचा दुष्काळ

एल निनोमुळे राज्यात यंदा पाऊस कमी पडणार हे आपल्याला एप्रिलपासून ठाऊक होते. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तसे सांगितले होते. इतकेच काय जून महिन्यात किरकोळ पाऊस झाला तेव्हा अजून पाऊस सुरू झालेला नाही, सरकारने सांगितल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरण्या करू नयेत असेही फडणवीस म्हणाले होते. नंतर पाऊस झाल्यावर सरकारने आता पेरण्या करा असा आदेश दिल्याचे वा जाहीर केल्याचे बातम्यांमध्ये तरी कुठेही दिसत नाही. कदाचित स्थानिक पातळीवर शेती अधिकाऱ्यांनी याबाबत सूचना केल्या असतील. तसेही शेतकरी अशा निर्णयांबाबत सरकारवर कधीच अवलंबून नसतात. त्यांचे म्हणून स्वतःचे ठोकताळे असतात. त्यांच्या त्यांच्या जमिनीची स्थिती, त्यांच्याकडचा पाऊस या आधारे ते आपापला निर्णय घेत असतात. पण यंदा मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पेरण्या होऊच शकल्या नाहीत. झाल्या तर त्या काहीच दिवसांमध्ये करपून गेल्या. एका अर्थाने हे सर्व होणार याची पूर्वकल्पना होती. पण सरकारने याला तोंड देण्याची तयारी काय केली हा कळीचा मुद्दा आहे. दिसते असे की, जुलैमध्ये बऱ्यापैकी पाऊस झाल्याने आपल्या यंत्रणा सुस्तावल्या. ऑगस्टमध्ये संमिश्र वृष्टी झाली. सरकाला मुख्यतः गणपती वगैरे उत्सव जोरजोरात साजरा व्हायला हवा होता. तसे झाले की, बहुतांश जनता त्या थाटामाटात गुंतून राहते. त्यामुळे दुष्काळाची चर्चा बंद करून टाकण्यात आली होती. पण जमिनीवरचे वास्तव बदलणारे नव्हते. पेरण्या वाया गेल्या आणि रबी हंगामात पेरण्या तर सोडाच पण पिण्याचे पाणीदेखील कुठून आणणार असा प्रश्न अनेक ठिकाणी निर्माण झाला आहे. धाराशिव, बीड, संभाजीनगर, हिंगोली वगैरे जिल्ह्यांमधून स्थलांतरी सुरू झाले आहे. साहजिकच सरकारला जी दडपादडपी करायची होती ती जमली नाही. शेतकऱ्यांनी आणि विरोधकांनी रस्त्यावर आंदोलने सुरू केली. मग एनडीआरएफचे नियम सांगितले गेले. ही केंद्रीय संस्था आहे. मान्सूनचा हंगाम तीस सप्टेंबरपर्यंत असल्याने ही संस्था पाच ऑक्टोबरपर्यंत थांबून मगच दुष्काळ जाहीर करणे किंवा त्याबाबतच्या उपाययोजना करणे याबाबत हालचाली सुरू करते. त्या तारखेनंतरचे अहवालच ग्राह्य मानले जातात.

### जाहिरातबाजी नको

एक तांत्रिक बाब म्हणून ही अट मान्य केली तरी राज्य सरकारने तिच्या आड दडण्याचे कारण नव्हते. पण फडणवीस सरकार ते करायला गेले आणि तोंडघशी पडले. मग चुकीची जाणीव झाल्यावर गेल्या आठवड्याभरात एकदम आम्ही एनडीआरएफसाठी थांबलेलो नाही, शेतकऱ्यांना मदत दिली जाईल वगैरे भाषा सुरु झाली. आता बुधवारपासून दुष्काळाचे पंचनामे सुरू होणार आहेत. विरोधकांनी ओरडा केला नसता तर पार ऑक्टोबरनंतर आणि कदाचित नवरात्र, दांडिया किंवा दसऱ्याचे मेळावे वगैरे झाल्यानंतर सरकारने सावकाश हे करायला घेतले असते. वास्तविक दुष्काळ येणार हे नक्की असताना प्रत्येक आठवड्याला व महिन्याला जिल्ह्याच्या स्तरावर सरकारने आढावा घ्यायला हवा होता. त्या त्या जिल्ह्यातील स्थितीनुसार तेथे उपाययोजना व मदत सुरु करायला हवी होती. त्यासाठी निधीची तरतूद आधीच करायला हवी होती. निवडणुका जिंकायच्या असल्या की विजेच्या वेगाने लाडकी बहीणसारख्या योजना राबवता येतात. त्या योजनेत पात्र नसलेल्या लाखो बहिणींना कोट्यवधी रुपये वाटून मते मिळवता येतात. नंतर हळूच या बहिणींची नावे कटाप केली जातात. पण त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. शेतकऱ्यांच्या वाट्याला मात्र असह्य उपेक्षा येते. शेतकरी सगळया जगाचा पोशिंदा वगैरे भाषा समारंभात करायची, पण प्रत्यक्षात त्याला भिकाऱ्याप्रमाणे वागवायचे अशी या सरकारची नीती आहे. पाण्याची टंचाई असली तरी वेळेवर त्या त्या भागात टँकर सुरू होईलच याची हमी नसते. टँकर सुरू झाला तरी त्यात दरवर्षीचा ठराविक भ्रष्टाचार होतो. शिवाय, एकेका टँकरसाठी लोकांच्या मारामाऱ्या होत राहतात. दुष्काळ येणार आहे हे कळल्यानंतर सरकार याचे नियोजन आधीच करू शकले असते. पण अत्यंत कार्यक्षम वगैरे म्हणवले जाणारे फडणवीस आणि हे सरकार लोकांचे सरकार आहे असे कंटाळा येईपर्यंत सांगणारे एकनाथ शिंदे यांनी याबाबत काहीही केलेले दिसत नाही. आता एकाएकी जाग आल्याप्रमाणे बैठका, टँकर इत्यादींचे नियोजन यांचा धडाका लावला जाईल व त्याच्या बातम्या पेरून सरकार कसे काम करते आहे याच्या जाहिराती केल्या जातील.

### शेतकऱ्यांना जगवायला हवे

सोलापूर व आसपासच्या जिल्ह्यातून चाराटंचाईच्या बातम्या आल्या आहेत. चाऱ्याचे दर सहा हजार रुपये टन झाले आहेत. गुरांना जगवायचे कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने याबाबत मे, जून, जुलै महिन्यात काय नियोजन केले हे कळायला हवे. पूर्ण पीक नष्ट झालेल्या शेतकऱ्यांना पैशांची मदत देणे हे ठीक आहे. पण काही आणेच पिके आलेल्या शेतकऱ्यांनाही मदत केली जायला हवी. शेतमजुरांचाही विचार व्हायला हवा. सरकार रेशनवर फुकट धान्य देत असल्याने भूकबळी पडणार नाहीत अशी आशा आहे. पण या भागातील शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने तसेच आजारपणे इत्यादींचेही प्रश्न महत्वाचे असतील. त्याबाबत सरकारी पातळीवर नियोजन हवे. अन्यथा काही नेते काही भागात अशी लग्ने लावून देतील आणि त्याच्या पुढचे वर्षभर जाहिराती करून लग्नांपेक्षा जास्त खर्च जाहिरातींवर करतील. मुख्यमंत्री आजपासून दुष्काळी भागांचा दौरा करणार आहेत. त्यांनी मंत्र्यांनाही आपापल्या भागातील माहिती जमवायला सांगितली आहे. ते स्वागतार्ह आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्याला सर्वात मोठा फटका बसला असून तेथे ५० टक्क्यांहून कमी पाऊस झाला आहे. ७५ टक्क्यांहूनही कमी पाऊस झालेल्या जिल्ह्यांमध्ये कोकणातील सिंधुदुर्ग तसेच एरवी भरपूर पाऊस पडणारे कोल्हापूर, नाशिक यासारखे जिल्हे आहेत. सहा जिल्ह्यांमध्ये सुमारे ४० टक्के पाऊस कमी झाला आहे. पुणे आणि नाशिक महसुली विभागात तीस टक्के कमी पाऊस झाला आहे. तिथली धरणे बहुदा जानेवारीतच कोरडी पडतील अशी अवस्था आहे. मराठवाड्यामध्ये काही भागात तर आजच मे महिन्यासारखी पाण्याची स्थिती झाली आहे. सहकारमंत्री व लातूरचे नेते बाबासाहेब पाटील यांनी असा दुष्काळ मी आयुष्यात पाहिलेला नाही असे उद्गार काल एके ठिकाणी काढले. आता तरी त्यांनी सरकारमध्ये याचे नियोजन अधिक वेगाने व चांगले होईल यासाठी जोर लावावा. आपल्या सुदैवाने देशात गहू, तांदुळ व अन्नधान्याचे साठे पुरेसे आहेत. त्यामुळे ते उपलब्ध करता येईल. पण पाण्याचे काय करणार, गुरे कशी जगवणार आणि शेतकऱ्यांच्या रोजगाराचे काय करणार हे मुख्य प्रश्न आहेत. १९७२ च्या दुष्काळातून रोजगार हमी योजना सुरू झाली. पण मोदी सरकारला तर अशा योजनांची चीड आहे. तिने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे स्वरुप व नाव बदलून टाकले आहे. नाव जनतेचे पण काम अदानीसारख्यांचे अशी नीती असलेल्या सरकारकडून वेगळी अपेक्षा करता येत नाही. पण महाराष्ट्रातील प्रश्न विक्राळ आहे. जसजसा उन्हाळा येईल तसा तो आणखी भयंकर होत जाणार आहे. सरकारने याबाबत विरोधकांसह सर्वांना विश्वासात घेऊन नियोजनपूर्वक उपाययोजना कराव्यात.

## विचार

# जीडीपी वाढला, पण सामान्य त्रस्तच

**_भारताने २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीमध्ये ७.८ टक्के जीडीपी वाढ नोंदवली. या आकड्याभोवती निर्माण झालेला वाद, जीडीपी मोजणीच्या नव्या पद्धतीमुळे झालेल्या बदलांची सरकारी कबुली, अर्थतज्ज्ञांकडून उपस्थित केले गेलेले प्रश्न आणि दुसरीकडे रोजगार, उत्पन्न आणि महागाईच्या पातळीवर सामान्य नागरिकांना जाणवणारे वास्तव यामुळे अर्थव्यवस्था वेगाने वाढल्याचा लाभ सामान्य माणसाच्या घरापर्यंत का पोहोचत नाही, असा प्रश्न पडतो._**




**कैलास ठोळे**

भारताच्या अर्थव्यवस्थेने अलिकडेच पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधून घेतले. २०२६-२७ च्या एप्रिल-जून तिमाहीमध्ये जीडीपी ७.८ टक्क्यांनी वाढला. मागील तिमाहीतील ८.६ टक्क्यांच्या तुलनेत हा वेग काहीसा कमी असला, तरी जागतिक पातळीवरील प्रतिकूल वातावरण पाहता तो समाधानकारक म्हणावा लागेल. विशेष म्हणजे, रिझर्व्ह बँकेच्या सात टक्के अंदाजापेक्षाही ही वाढ अधिक आहे. खासगी गुंतवणुकीत वाढ, देशांतर्गत मागणी, सरकारी भांडवली खर्च आणि निर्यात यांचा या वाढीत वाटा असल्याचे विविध विश्लेषणांमधून पुढे आले आहे; मात्र याच वेळी जीडीपीच्या आकडेवारीवरून निर्माण झालेला वाद दुर्लक्षित करता येणार नाही. माजी अर्थसचिव सुभाषचंद्र गर्ग यांनी या आकडेवारीच्या पद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. काही अर्थतज्ज्ञांनी नव्या मालिकेतील आकडे आणि जुन्या मालिकेतील आकडे यांची थेट तुलना करणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले असले, तरी आकडेवारीची पारदर्शकता आणि तिच्या बदलांचे सुस्पष्ट स्पष्टीकरण ही मागणी रास्त आहे. माजी मुख्य सांख्यिकी प्रणब सेन यांनीही नव्या आकडेवारीबाबत काही शंका व्यक्त केल्या. इथे सरकारची बाजूही समजून घेणे आवश्यक आहे. जीडीपीची नवी मालिका २०११-१२ ऐवजी २०२२-२३ हे वर्ष आधारभूत मानून तयार करण्यात आली आहे. अर्थव्यवस्थेच्या बदललेल्या स्वरूपाचे अधिक अचूक चित्र मिळावे, नव्या क्षेत्रांचा समावेश व्हावा, हा त्यामागचा उद्देश आहे. सरकारने नव्या मालिकेत जीएसटी, वाहन नोंदणी, कंपन्यांची माहिती, बँकिंग क्षेत्रातील माहिती अशा अधिक व्यापक स्रोतांचा वापर केल्याचे सांगितले आहे. मात्र यातूनच या वाढीचा खरा लाभ सामान्यजनांच्या दैनंदिन आयुष्यात फरक का घडवत नाही, असा प्रश्नही चर्चेत आहे.

उत्पादनक्षेत्रात 'डबल डिफ्लेशन' आणि किंमत मोजण्यासाठी अधिक व्यापक निर्देशांकांचा वापर करण्यात आला आहे. आर्थिक सल्लागार आणि सांख्यिकी अधिकाऱ्यांनीही या तांत्रिक बदलांची माहिती दिली आहे. नव्या मालिकेत उत्पादक किंमत निर्देशांकाचा वापर वाढवणे, किंमत घटकांचे अधिक व्यापक मोजमाप करणे आणि तिमाही जीडीपीच्या गणनेत नव्या 'डेन्टन' पद्धतीचा वापर करणे यांसारखे बदल झाले आहेत. सरकारच्या मते, यामुळे जुन्या पद्धतीतील काही विसंगती दूर होऊन अर्थव्यवस्थेचे अधिक वास्तव चित्र दिसेल; परंतु इथेच सरकारपुढे मोठे आव्हान आहे. गणित बरोबर असणे पुरेसे नाही, तर त्या गणितावर लोकांचा विश्वास असणेही तेवढेच महत्त्वाचे आहे. जीडीपीची नवी मालिका अधिक अचूक असेल, तर त्यामागील संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे जनतेसमोर मांडली पाहिजे. विशेषतः जुन्या आणि नव्या मालिकेतील फरक, मागील वर्षांच्या आकडेवारीतील सुधारणा आणि त्याचा चालू वाढीच्या दरावर झालेला परिणाम याबाबत सविस्तर माहिती सार्वजनिक केली पाहिजे. सरकारने २०२६ च्या अखेरीस मागील वर्षांची नवी 'बॅक सिरीज' उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे. हा वाद केवळ तज्ज्ञांच्या चर्चे पुरता मर्यादित राहू नये. कारण जीडीपीचा अंतिम अर्थ नागरिकांच्या जीवनमानाशी जोडलेला आहे. अर्थव्यवस्था ७.८ टक्क्यांनी वाढत असल्याचे सांगितले जाते; पण एखाद्या कुटुंबाला घरभाडे, शिक्षण, आरोग्य, अन्नधान्य, प्रवास आणि घरखर्च भागवताना अधिक कसरत करावी लागत असेल, तर त्याला ही ७.८ टक्के वाढ कुठे जाणवते? हा प्रश्न सामान्य नागरिकांचा आहे.

जीडीपी वाढ आणि रोजगारवाढ यांचा मेळ न बसणे, ही भारताच्या अर्थव्यवस्थेतील जुनी समस्या आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अलीकडील विश्लेषणातही भारताच्या वाढीसमोरील प्रमुख संरचनात्मक अडथळ्यांमध्ये रोजगार आणि उत्पादकतेतील तफावत अधोरेखित करण्यात आली आहे. शेती देशाच्या जीडीपीमध्ये तुलनेने कमी वाटा उचलते; परंतु त्यात मोठ्या प्रमाणावर कामगार अवलंबून आहेत. याउलट उच्च उत्पादकता असलेल्या आधुनिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होत नाही. याचा अर्थ असा, की भारताला केवळ 'जीडीपी वाढणारी अर्थव्यवस्था' न राहता 'रोजगार निर्माण करणारी अर्थव्यवस्था' बनावे लागेल. कारखाने उभे राहणे, गुंतवणूक वाढणे, निर्यात वाढणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत; पण त्यातून किती स्थिर, चांगल्या वेतनाच्या नोकऱ्या सामाजिक सुरक्षेसह निर्माण होतात, हे त्याहून महत्त्वाचे आहे. आज देशासमोर आणखी एक विरोधाभास आहे. पहिल्या तिमाहीमध्ये खासगी गुंतवणुकीत सुधारणा झाल्याचे संकेत आहेत. स्थिर भांडवली निर्मितीचा वाटाही वाढला आहे; पण ही गुंतवणूक व्यापक रोजगारनिर्मितीत कितपत परिवर्तीत होते, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे. दरम्यान, भारताबाहेरील परिस्थितीही आश्वासक नाही. मध्यपूर्वेतील संघर्षामुळे ऊर्जा पुरवठ्याची जोखीम वाढली आहे. भारत मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात करतो. त्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या, की वाहतूक खर्चापासून उत्पादन खर्चापर्यंत आणि शेवटी सामान्य ग्राहकाच्या खिशापर्यंत त्याचा परिणाम पोहोचतो. चालू खात्यावरील ताण वाढण्याची शक्यता निर्माण होते.

एप्रिल-जून तिमाहीमध्ये भारताची चालू खात्यातील तूट ४.२ अब्ज डॉलर म्हणजे जीडीपीच्या ०.५ टक्के होती. अमेरिकेचे ट्रम्प प्रशासनही जागतिक व्यापार व्यवस्थेत अनिश्चितता निर्माण करणारे निर्णय घेत आहे. टॅरिफच्या बदलत्या धोरणामुळे भारतीय निर्यातदारांसमोर बाजारपेठ, किंमत आणि स्पर्धात्मकतेची आव्हाने आहेत. काही क्षेत्रांना टॅरिफमधून सवलत मिळत असली, तरी अमेरिकन बाजारपेठेतील धोरणात्मक अनिश्चितता भारतीय उद्योगासाठी जोखमीची आहे. त्यामुळे भारताने एकाच बाजारपेठेवर अवलंबून न राहता निर्यात बाजारपेठांचे विविधीकरण करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्थेने दाखवलेली लवचिकता नक्कीच कौतुकास्पद आहे. मध्यपूर्वेतील संघर्ष, जागतिक व्यापारातील अडथळे आणि ऊर्जा किमतींचा दबाव असूनही भारताची देशांतर्गत मागणी आणि गुंतवणूक टिकून आहे. एप्रिल-जूनमध्ये वस्तूंच्या निर्यातीतही वाढ झाली; पण या लवचिकतेचा पुढचा टप्पा अधिक समावेशक असला पाहिजे. मोठ्या शहरांमधील उच्च उत्पन्न गटाचा उपभोग, डिजिटल अर्थव्यवस्था किंवा मोठ्या कंपन्यांची उलाढाल वाढली, म्हणून संपूर्ण देशाची आर्थिक स्थिती सुधारली असे मानणे धोकादायक आहे. ग्रामीण भागातील उत्पन्न, छोट्या व्यापाऱ्यांची उलाढाल, सूक्ष्म उद्योगांची स्थिती, शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष उत्पन्न आणि तरुणांना मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी यांची स्वतंत्र मोजणी आवश्यक आहे.

जीडीपी हा अर्थव्यवस्थेचा तापमापक आहे. तो संपूर्ण आरोग्य अहवाल नाही. तापमान कमी-जास्त झाले, म्हणून रुग्णाची संपूर्ण प्रकृती समजत नाही. त्याचप्रमाणे जीडीपी वाढला म्हणून प्रत्येक नागरिक समृद्ध झाला असे म्हणता येत नाही. दरडोई उत्पन्न, रोजगाराची गुणवत्ता, वास्तविक वेतन, महागाई, आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा या सर्वांचा विचार करावा लागतो. सरकारने त्यामुळे केवळ '७.८ टक्के वाढ' या आकड्याचा उत्सव साजरा करण्याऐवजी त्यामागील प्रश्नांना उत्तरे द्यायला हवीत. किती रोजगार निर्माण झाले? त्यातील किती नियमित आहेत? वास्तविक वेतन किती वाढले? ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न किती वाढले? लघु उद्योगांची स्थिती काय आहे? तरुणांच्या कौशल्याला योग्य रोजगार मिळतो आहे का, या प्रश्नांची आकडेवारी नियमितपणे आणि पारदर्शकपणे समोर आली पाहिजे. आज भारतासमोर संधीही मोठी आहे आणि आव्हानेही. जागतिक कंपन्या चीनच्या पर्यायांचा शोध घेत आहेत. उत्पादन, सेमीकंडक्टर, डिजिटल सेवा, संरक्षण, हरित ऊर्जा अशा क्षेत्रांमध्ये भारताला मोठी संधी आहे; परंतु या संधीचे रूपांतर रोजगार आणि व्यापक उत्पन्नवाढीत झाले नाही, तर उच्च जीडीपीचा लाभ मर्यादित वर्गापुरता राहण्याची भीती आहे.

## चर्चा आजची

# सणांचा उत्साह फक्त मोबाईलमध्येच?



**अंतरा पारंगे**

आजच्या युगात सणांमागचा हा उद्देश कुठेतरी मागे पडतोय, असे वाटत आहे. कारण आज माणसं मनानी नाही तर तंत्रज्ञानाने प्रत्येकाशी जोडली गेली असल्याचे पाहायला मिळत आहे. मात्र त्यात प्रेम, आपुलकी, जिव्हाळा कुठेच नसतो. काळाप्रमाणे बदलणं तर आवश्यकच आहे. पण सण समारंभातून आपल्या भाषेचं खऱ्या अर्थानं संवर्धन करण्याची आणि आपला इतिहास आणि संस्कृतीची मुलांना ओळख आणि जाणीव करून देण्याची गरज आहे. तसेच सणांमधून किंवा मिरवणुकीमधून काही सामाजिक संदेशही देता येऊ शकतात. मात्र बरच जण मराठमोळा पोशाख करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकणं ही तरुणाईची सण साजरा करण्याची नवीन पद्धत आहे. फक्त या सर्वांचा अतिरेक नको व्हायला, अशी चर्चाही सर्वत्र सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे.

पूर्वी सण, उत्सव हे एकत्र येण्याचा दिवस असायचे. परंतु, आजकाल तसं राहिले नाही. हे सण साजरे करणं फक्त दिखावा झाला आहे. सण, उत्सवामागचे खरं कारण, शास्त्र मात्र कुठेतरी हरवत असल्याचे पाहायला मिळत आहे. कारण आजच्या डिजिटल युगात सणाचा उत्साह साजरा करण्याची पद्धतही डिजिटल झाली आहे. बाप्पाच्या समोर बसून पारंपरिक भजने किंवा आरत्या म्हणण्यापेक्षा, आजची तरुणाई रिल्स बनवणे, स्टेटस ठेवणे आणि फोटो शेअर करणे यात जास्त व्यस्त असते. तरुण मुलं बाप्पाच्या आगमनाचा आणि विसर्जनाचा उत्साह मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद करून सोशल मीडियावर व्यक्त करण्यात अधिक धन्यता मानत आहे. मोबाईलचा वाढता वापर हा नव्या पिढीच्या उत्साहाचा एक मुख्य भाग बनला आहे.

सध्या सण-समारंभात आलेला दिखाऊपणा आपल्या संस्कृतीला पोषक असा आहे. पण फक्त शोबजीचं न करता सर्वांनी आपुलकीने सण साजरे करायला हवे. लोकांमधे एकता आणणं हे सणांचं मुख्य कारण असतं. सणांच्या निमित्ताने आपण नातेवाईकांना भेटतो, त्यांना सणांच्या शुभेच्छा देतो. पण आता सणांना काहीसं वेगळं रूप आले आहे. परंपरा जोपासणं हे विधान वगळून केवळ मज्जा, मस्ती म्हणून सणांकडे पाहिले जात आहे. या डिजिटल युगात तरुणाईचा कल दिखावेपणाकडे जास्त वळला जात आहे. दुसऱ्यापेक्षा छान दिसणं, सुंदर फोटोज काढून ते सोशल मीडियावर अपडेट करणं, नवीन नवीन प्रकारच्या रिल्स तयार करणे हेच सतत सुरु असते. तर मनातील जिव्हाळ्याची भावना एखादी कॅप्शन टाकून व्यक्त करणं अशा अनेक कामात तरुणाई रमून जात आहे.

आता उत्सवाला खरंच वेगळं वळण आले आहे. आताची तरुणाई सत्यात कमी आणि सोशल मीडियावर जास्त वावरत असल्याचे दिसून येत आहे. पूर्वी जागरणासाठी भजन, पारंपरिक नाच याचे आयोजन केलं जायचे. तर महिला गाणी, झिम्मा-फुगडी यामध्ये रमून जायच्या. मात्र सध्या सोशल मीडियावर काय ट्रेंड चालू आहे, कोणती नवीन रिल्स आली आहे, त्याप्रमाणे नाचून रिल्स तयार करण्यात सर्वजण धन्यता मानत आहेत. बरं यातील गाणीही काही पारंपरिक असतात असे नाही. काही गाणी गाण्यांचा अर्थ तर सोडाच पण त्यांचा उच्चारही स्पष्ट करता येत नाही; तरीही त्यावर रिल्स करून, त्या व्हिडीओ सोशल मोडियावर टाकणं यात आपला बराचसा बहुमोल वेळ घालवत आहेत. कारण सोशल मीडियावर दिखाऊपणा दाखवण्याच्या नादात उत्सवातील आपुलकी जपायला ते विसरत चालले आहेत. दिखाऊपणा दाखवण्यापेक्षा जरा सणांचे महत्त्व जाणून घेणं हे ही तितकेच महत्वाचे आहे.

रोजच्या धावपळीमध्ये आपण स्वत:पासून, कुटुंबापासून आणि समाजापासून दूर जात असतो. सण आपल्याला एकत्र आणतात आणि जीवनाकडे नव्या ऊर्जेने पाहण्याची संधी देतात. परंपरा जपण्यासाठी किंवा मौज मजा करण्यासाठी का होईना बाहेर गावी राहणारे नोकरदार मंडळी खास सुद्धा घेऊन गावी गणेशात्सवासाठी येतात. मात्र आज प्रत्येक घरातील व्यक्ती स्वत:च्या मोबाईलच्या स्क्रीनमध्ये व्यस्त असतो. एकाच घरात राहणारी माणसे एकमेकांशी संवाद साधत न तर फायदा. काहींना तर घरात कोण पाहुणे आले, बाहेर काय चाललंय हेही कळत नाही.

उत्सवाचा मूळ गाभा असलेली एकोप्याची भावना, कलात्मकता आणि सात्विक आनंद बाजूला पडला असल्याचेही सद्या दिसून येत आहे. आता पैसा, स्पर्धा, दिखावा आणि कर्णकर्कश आवाजाने जागा घेतली आहे. पूर्वी गणेशाची मूर्ती आणताना तसेच गणेश विसर्जनाच्या वेळी भजन गायली जायची मात्र आता मिरवणुकीत मोठ्या आवाजात डीजे लावला जातो.

या डीजेवरही नको ती गाणी वाजविली जातात. आणि त्या गाण्यांवर त्यालाच वेडावाकडा असा डान्स करणारी पोर. मग याला धार्मिक उत्सव म्हणायचं का? यातही बराचसा तरुण वर्ग स्वतः आनंद घ्यायचा सोडून व्हिडीओ, फोटोज काढण्यात व्यस्त राहतात. तर मग जुन्या रीती आणि परंपरा कधी समजून घ्यायला यांनी. आपण सण साजरे का करतो? केवळ परंपरा म्हणून? मनोरंजनासाठी? की सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडिओ टाकण्यासाठी? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## लोकसंसद

### मुंबई उच्च न्यायालयाचे स्वागतार्ह आदेश

गणेशोत्सवात मुंबईत होणाऱ्या पराकोटीच्या ध्वनीप्रदूषणाची व वायुप्रदूषणाची स्वतःहून (सुओ मोटो) दखल घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यास बंदी घातली आहे, तसेच डीजे, डॉल्बी आणि लेझर लाइट्सचा वापर पूर्णपणे अनावश्यक असल्याचे म्हटले आहे. उच्च न्यायालयाचा हा निर्णय स्वागतार्ह असून सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा देणारा आहे. यावेळी लाखो भाविकांचा सहभाग असलेली आणि पारंपरिक पद्धतीने शांततेत पार पडणाऱ्या पंढरपूरच्या वारीचा उल्लेख उच्च न्यायालयाने केला. गेल्या काही वर्षांत आपल्याकडे सण, उत्सव साजरे करण्याच्या पद्धतीला विकृत स्वरूप आले असून उत्सवाच्या नावाखाली उच्च क्षमतेच्या कानठळ्या बसवणारे डीजे लावले जातात. या डीजेच्या आवाजामुळे तसेच रस्त्यांवरच्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला आणि आजारी व्यक्तींना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागते. इतकेच नव्हे तर निसर्गातील सर्व प्राणी, पक्षी, पाळीव प्राणी यांच्यावरही या दिवसात मोठा आघात होतो. डोळ्यांना इजा पोहोचवणाऱ्या लेझर लाइट्समुळेही अनेक नागरिकांच्या डोळ्यांना गंभीर इजा झाल्याच्या आणि काहींची दृष्टी कायमची गेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. आता प्रशासनाने या आदेशांचे कडक पालन करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर करणे गरजेचे आहे. तसेच एक सुजाण नागरिक म्हणून आपणही स्वतःहून फटाके आणि डीजेला नकार देऊन पर्यावरणपूरक सण साजरे करायला हवेत.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# सत्यशोधक समाजाची स्थापना

थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातीभेद, अंधश्रद्धा तसेच जमीनदार आणि पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून समाजाला मुक्त करण्याच्या हेतूने सत्याशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. सत्यशोधक समाज हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीचे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.

निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी हा विचार महात्मा फुलेंनी मांडला. महात्मा फुले यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी गुलामगिरी हा उपदेशपर ग्रंथ लिहून गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ सुरू करण्याचा निर्धार केला. सार्वजनिक सत्यधर्म हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. सत्यशोधक समाजातर्फे दीनबंधू नावाचे एक साप्ताहिक मुखपत्र म्हणून चालविले जात होते. सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ।। हे या समाजाचे घोषवाक्य होते.

ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजातील शोषित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. समाजाच्या निम्नवर्गीय लोकांवर होत असलेल्या अन्याय आणि अत्याचारांविरुद्ध ते लढले. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी जातिव्यवस्थेवर कठोर टीका केली आणि सर्व जाती-धर्मांच्या लोकांना समानतेची शिकवण दिली. सत्यशोधक समाजाचा मुख्य उद्देश होता धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अंधश्रद्धा, कर्मकांड, आणि भेदभावाला विरोध करणे. फुले यांनी हे सांगितले की, समाजातील सर्वच लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव झाली पाहिजे. त्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षण, दलित शिक्षण आणि शैक्षणिक सुधारणांना मोठे प्राधान्य दिले. सत्यशोधक समाजाने अनेक समाजसुधारणांसाठी काम केले. त्यांनी जातिव्यवस्थेचा विरोध करून विवाह विधी सुलभ केले. या समाजाच्या अंतर्गत विवाह सोहळ्यात ब्राह्मण पुरोहितांची आवश्यकता नसल्याचे सिद्ध केले. सर्व जाती-धर्मातील लोकांनी आपापसात विवाह करण्याचा आग्रह धरला. सत्यशोधक समाजाच्या या उपक्रमामुळे सामाजिक बंधने हळूहळू कमी होऊ लागली. महात्मा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनीही या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्या पहिल्या शिक्षिका होत्या आणि स्त्री शिक्षणासाठी त्यांनी खूप मोठे कार्य केले. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांसाठी लढा दिला गेला आणि महिलांना शिक्षण मिळावे, त्यांच्या जीवनात बदल व्हावा, यासाठी प्रयत्न करण्यात आले.

आजच्या काळातही सत्यशोधक समाजाच्या विचारांची गरज आहे. जातीयवाद, धार्मिक अंधश्रद्धा, आणि सामाजिक विषमता अजूनही समाजात बळावलेल्या आहेत. फुले यांनी दिलेली समानतेची शिकवण आणि शिक्षणाचे महत्त्व आजच्या समाजात अजूनही लागू होते. सत्यशोधक समाजाच्या विचारांवर आधारित समाज सुधारणा आजच्या काळातील समस्यांना तोडगा देऊ शकतात.

सत्यशोधक समाज स्थापना दिन हा सामाजिक सुधारणा, समानता, आणि शिक्षणाचा महत्त्वाचा संदेश देतो. महात्मा फुले यांची विचारसरणी आणि कार्य आजच्या




पिढीने आत्मसात करणे आवश्यक आहे. सत्यशोधक समाजाच्या विचारांवर चालणारे समाज सुधारक आजही जातिव्यवस्थेच्या विरोधात, शिक्षणाच्या प्रसारासाठी आणि समानतेसाठी काम करत आहेत. त्यांचा आदर्श घेऊनच आपण भविष्याकडे वाटचाल केली पाहिजे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२४ सप्टेंबर
१) श्रीम.उषा श.पटवर्धन
ब्राम्हणआळी, अलिबाग
दि.२४-०९-१९४२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु.३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**आद्या उमेश अलिबागकर स्मरणार्थ अलिबाग**

# नेरळमध्ये गढूळ पाणीपुरवठा

## • ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; सर्वत्र संताप

**| कर्जत | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या नेरळ ग्रामपंचायतमध्ये नळाला गढूळ पाणी येत आहे. याबद्दल प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. जलशुद्धीकरण केंद्र असून देखील गढूळ पाण्याचे वितरण करण्यात आल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



कर्जत तालुक्यातील सर्वात श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीचा कारभार सध्या पूर्णपणे कोलमडला आहे. गेल्या कित्येक महिन्यांपासून विविध माध्यमातून आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणला जात आहे. तरीही प्रशासक राजवट असून अधिकाऱ्यांकडून ग्रामस्थ आणि रहिवाशी यांना सुखसोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत नाही. पावसाळ्यातील चार महिने बहुसंख्य ठिकाणी पाण्याचा उपसा होतो तेथे गढूळ पाणी असते. नेरळ नळपाणी योजनेचे पाणी उचलले जाते त्या उल्हास नदीमध्ये देखील गढूळ पाणी आहे. त्यामुळे जलशुद्धीकरण यंत्रणा महत्वाची ठरते. परंतु, नेरळ ग्रामपंचायत नळपाणी योजनेची जलशुद्धीकरण यंत्रणा कार्यक्षम असताना देखील नळाद्वारे येणारे पाणी हे गढूळ येत असल्याने ग्रामस्थ संतप्त आहेत.

नेरळ ग्रामपंचायत दरवर्षी पाणी शुद्ध करण्यासाठी लाखो रुपये खर्च करते. मात्र तरीही नळाला आलेले पाणी गढूळ येत असल्याने ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आज नेरळमधील सर्व समाजमाध्यम यांच्यावर गढूळ पाण्याबद्दल संताप व्यक्त होत आहे. आज प्रत्यक्षात नेरळकरांच्या नळाला थेट चिखलमय आणि गढूळ पाणी आले आहे. अनेकांनी ‘कॉफी तयार करून पाठवली आहे’ अशी मल्लिनाथी जोडली आहे. तर पाणी शुद्ध देणार नाहीत तर ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टीची आकारणी बंद करावी, अशी सूचना आणि मागणी केली आहे. नळाद्वारे येणाऱ्या या दूषित पाण्यामुळे लहान मुले आणि वृद्ध आजारी पडत आहेत. ‘आम्ही ग्रामपंचायत नियमित कर भरूनही माती मिश्रित पाणी आणि दूषित पाणी प्यायचे का? असा सवाल केला आहे. असे दूषित पाणी पिऊन आम्हाला, आमच्या मुलांच्या आरोग्याला काही झाल्यास त्याला जबाबदार असणारे अधिकारी खर्च उचलणार का?’ असा जळजळीत प्रश्न स्थानिक रहिवाशांनी उपस्थित केला आहे. तर काही ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांनी स्वतः हे पाणी पिऊन दाखवावे, असा उपरोधक टोला लगावला आहे.

> ग्रामपंचायतचा ढिसाळ कारभार यास जबाबदार असून गढूळ पाणी का येते? आमच्या कर, टॅक्समधून लाखो रुपयांचे जल शुद्धीकरण साहित्य आणले जाते. तरीही पाणी गढूळ कसे? असा प्रश्न असून पाणी शुद्धीकरण करण्यासाठी निधी खर्च होतो, मात्र साहित्य खरेदी केले जाते का, याचा शोध घ्यावा लागेल.
>
> **– गोरख शेप**



## ज्येष्ठ नागरिकांनी सायबर गुन्ह्यापासून दूर राहावे

### ■ राहुल वरोटे यांचे प्रतिपादन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

ज्येष्ठ नागरिकांची सर्वाधिक फसवणूक अँड्रॉइड मोबाईल वापरामुळे होत आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी सायबर गुन्ह्यापासून दूर रहावे, असे आवाहन राहुल वरोटे यांनी केले. तसेच, नेरळ गावातील वाहतूक कोंडी आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या अडचणी दूर करण्यासाठी पोलीस आणि ग्रामपंचायत कटिबद्ध आहे, असे आश्वासनही त्यांनी नेरळ ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात दिले.

नेरळ ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या ३३व्या वर्धापन दिनानिमित्ताने वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी कर्जत पंचायत समिती सदस्य भगवान चंचे, नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे, ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांच्यासह कर्जत पंचायत समिती माजी उप सभापती अरविंद पाटील, संत शिवनाथ बाबा, माजी अध्यक्ष किसन खडे आदींसह मंडळाचे अध्यक्ष सावळाराम जाधव, उपाध्यक्ष विलास कांबळे, सूर्यकांत चंचे, कार्याध्यक्ष दीपक मनवे, सचिव दशरथ जाधव, खजिनदार नीता जोगळेकर तसेच अन्य पदाधिकारी भगवान चव्हाण, मधुकर गवळी, बाळकृष्ण गोसावी, सुमन लोंगले, यशवंत दाभण, अर्जुन क्षीरसागर, मुत्सफा पोंजेकर, रंभाजी भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

मंडळाचे उपाध्यक्ष विलास कांबळे यांनी प्रास्ताविक, अहवाल वाचन संस्थेचे सचिव दशरथ जाधव यांनी, तर सूत्रसंचालन दिलीप बोरसे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने मंडळाचे ७५ वर्षे पूर्ण झालेल्या सदस्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांनी कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाने ओटीपी आणि पिन देऊ नये, तसेच एपीके फाइल कोणीही शक्यतो ओपन करू नये, अशी सूचना केली. तर मोबाईलद्वारे डिजिटल अरेस्टचा प्रकार कोणताही नसतो आणि त्यामुळे असे व्हिडीओ कॉल स्वीकारू नये, अशी सूचना पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांनी केले. तर जेष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी, वाहतूक कोंडी रोखण्यासाठी आम्ही ग्रामपंचायत यांच्यासोबत कार्यवाही करू, असे जाहीर केले.

## बसथांब्यासमोर वाहनांचे बेकायदा पार्किंग

### ■ प्रवाशांची गैरसोय
### ■ कामोठ्यात पार्किंगचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**



कामोठे शहरातील पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्याचा फटका सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांना बसत आहे. पनवेल महानगरपालिकेने उभारलेल्या बसथांब्यांच्या समोरच मोठ्या प्रमाणावर चारचाकी वाहने पार्क केली जात असल्याने बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बसथांब्यांसाठी निश्चित केलेल्या जागेच्या परिसरातच वाहने उभी राहत असल्याने बस थांबवताना चालकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे काही वेळा प्रवाशांना रस्त्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवाशांना याचा विशेष त्रास सहन करावा लागत आहे.

कामोठे परिसरात नागरिकांची संख्या आणि वाहनांची संख्या सातत्याने वाढत असताना उपलब्ध पार्किंगची व्यवस्था मात्र अपुरी पडत आहे. परिणामी रस्त्याच्या कडेला तसेच सार्वजनिक वापराच्या जागांमध्ये वाहने उभी करण्याचे प्रकार वाढले आहेत.

बसथांब्यांसमोर होणाऱ्या पार्किंगमुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका आणि वाहतूक विभागाने संयुक्तपणे पाहणी करून बसथांब्यांसमोरील अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## सोन्याचे ब्रेसलेट मूळ मालकास परत

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

चिपळूण जवळील पोफळी येथे महानिर्मितीचा महाराजा गणेशोत्सव साजरा होत आहे. या उत्सवाचे सचिव संजय घोलपकर यांचे सव्वा दोन तोळे वजनाचे सोन्याचे ब्रेसलेट गर्दीत अथवा कार्यक्रमादरम्यान हरवले होते. या गणेशोत्सवाच्या बंदोबस्तासाठी रत्नागिरी होमगार्ड पथकाच्या अश्विनी निकम या तेथे कर्तव्यावर तैनात होत्या. सांस्कृतिक भवन, पोफळी या ठिकाणी गस्त घालत असताना त्यांना हे सोन्याचे ब्रेसलेट सापडले. कसलाही लोभ न धरता त्यांनी तात्काळ या दागिन्याबाबत वरिष्ठांना आणि गणेशोत्सव समितीला माहिती दिली आणि ते ब्रेसलेट मूळ मालक संजय घोलपकरांच्या स्वाधीन केले.

## सर्पदंशाने वृद्धेचा मृत्यू

**रत्नागिरी :** रत्नागिरी तालुक्यातील गोळप धोपटवाडी येथे सर्पदंश झाल्याने वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. अनिता अनंत उभारे (वय ६०, रा. गोळप धोपटवाडी, रत्नागिरी) असे मृत महिलेचे नाव आहे. अनिता यांना १५ ऑगस्ट रोजी गोळप येथे शेतात काम करताना सर्पदंश झाला होता. यानंतर त्यांना उपचारासाठी प्रथम जिल्हा शासकीय रुग्णालय रत्नागिरी व नंतर कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. याठिकाणी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला, अशी नोंद पूर्णगड पोलिसात करण्यात आली आहे.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक

**मुंबई :** भारतीय राज्यघटनेत ५१ कलमानुसार जनतेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य सांगितले आहे. संविधानातील हे तत्व आपल्याला घराघरांमध्ये घेऊन जायचं आहे, प्रत्येक युवकाच्या मनात विवेकाचा दीप प्रज्वलित करायचा आहे, यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांची नितांत गरज आहे. आपल्या जीवनात निर्माण होणारे विविध प्रश्न वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर करून शास्त्रशुद्ध पद्धतीने कसे सोडवायचे? मानसिक आजारापासून कसं दूर राहायचं? हे समजून घेण्यासाठी एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा रविवार दि.२७ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा जादूटोणाविरोधी कायद्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी कार्यकर्त्यांची एक फळी निर्माण करायची आहे. ज्यांना सामाजिक कार्यात रस आहे असा युवक युवती व नागरिकांनी मोठ्या प्रमाणामध्ये या सभेला उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चिपळूण विभागातर्फे करण्यात येत आहे. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य संघटक प्रा. हरिभाऊ पाथोडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभणार आहे.

## प्रवासी महिलेची बॅग चोरीला

**राजापूर :** पुणे ते राजापूर एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या महिलेची बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केली. ही घटना रविवारी (दि.२०) घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनुजा प्रशांत कांबळे (वय ३२, मूळ रा. पासर्डे, ता. करवीर, जि. कोल्हापूर; सध्या रा. जैतापूर, ता. राजापूर) या पुणे-राजापूर एसटी बस क्र.एमएच १४ बीटी २२७२ मधून प्रवास करीत होत्या. प्रवासादरम्यान त्यांनी आपली काळ्या रंगाची ‘व्हिनस’ कंपनीची बॅग बसमधील वरच्या रॅकवर ठेवली होती. मात्र, प्रवास सुरू असताना अज्ञात चोरट्याने संधी साधून ही बॅग लंपास केली. त्यांच्या बॅगेमध्ये सोन्याच्या दागिन्यांसह एकूण २ लाख ६२ हजार ५०० रुपयांचा ऐवज होता. काही वेळाने बॅग चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर कांबळे यांनी राजापूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या घटनेप्रकरणी राजापूर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. चोरट्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप

### ‘आम्ही नाडसूरकर’ मंडळाचा शैक्षणिक उपक्रम

**| पाली | प्रतिनिधी |**



नाडसूर गावाच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या ‘आम्ही नाडसूरकर शहरवासी मंडळा’च्या वतीने शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचे कौतुक आणि गुणगौरव, तसेच विशेष प्रावीण्य मिळवलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. शिक्षणातील यशाचा सन्मान आणि विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाची दखल यांचा संगम या कार्यक्रमातून साधला.

दहावी आणि बारावी हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे आहेत. या टप्प्यांवर मिळवलेल्या यशाचे कौतुक झाल्यास विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळते. मंडळाचा हा गुणगौरव उपक्रम विद्यार्थ्यांच्या मेहनतीची दखल घेणारा ठरला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या गुणगौरवासोबतच विशेष प्रावीण्य मिळवलेल्या व्यक्ती पोलीस मित्र प्रभा द्रविड, भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चा दक्षिण रायगडचे जिल्हाध्यक्ष सुजित बारसकर यांचा देखील सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमामुळे शैक्षणिक यशाबरोबरच कर्तृत्ववान व्यक्तींच्या कामगिरीलाही व्यासपीठ मिळाले. गावातील गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला महत्त्व प्राप्त झाले.

या कार्यक्रमासाठी अक्षय धनवे यांनी विशेष आर्थिक सहकार्य केले. गावाशी असलेली बांधिलकी जपत शैक्षणिक उपक्रमाला दिलेले हे पाठबळ विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी उपयुक्त ठरले.

**प्रत्येक कार्यालयाला ५० लाखांचे अनुदान | केंद्रीय सचिवांकडून महसूलमंत्र्यांचे कौतुक**

# ‘आदर्श नोंदणी पॅटर्न’ आता देशभरात!

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून अस्तित्वात आलेल्या मॉडेल नोंदणी कार्यालयांच्या उपयोगितेची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. पुणे येथे सुरू झालेले मॉडेल नोंदणी कार्यालय आता देशभर प्रारंभ करण्याचे निर्देश केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागाने दिले आहेत.

विशेष म्हणजे, केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांनी अशी कार्यालये देशभर सुरू करण्यासाठी प्रत्येक कार्यालयासाठी ५० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले.



केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावित केंद्रीय नोंदणी विधेयक, २०२६ संदर्भात सर्व राज्यांच्या नोंदणी महानिरीक्षकांची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे व उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते. या बैठकीत प्रस्तावित विधेयकातील तरतुदी, संभाव्य परिणाम आणि राज्यस्तरावरील सुधारणांबाबत सविस्तर चर्चा करून राज्यांचे अभिप्राय व सूचना जाणून घेण्यात आल्या.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागाने महसूलवाढीसोबतच नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना यशस्वीपणे राबविले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्यावर, सर्व राज्यांनी असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्राच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने सुरू केलेल्या एक जिल्हा, एक नोंदणी, ई-प्रमाण, पासपोर्ट कार्यालयांच्या धर्तीवर उभारलेली आदर्श कार्यालये आणि ई-नोंदणी यांसारख्या गतिमान उपक्रमांचे केंद्रीय सचिवांनी विशेष कौतुक केले.

> **नागरिकांच्या सोयीसाठी भविष्यातही अधिक लोकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. पुणे येथे सुरू झालेल्या मॉडेल कार्यालयाची दखल केंद्राने घेतली. यातूनच या कार्यालयाची उपयोगात लक्षात येते.**
>
> **– चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**

## निवडक

### पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित

#### ■ वीज वितरण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**खांदेश्वर :** खांदा कॉलनी परिसरात मंगळवारी (दि.२२) सकाळी सुमारे नऊ वाजता कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक वीजपुरवठा खंडित करण्यात आला. गणेशोत्सवाच्या उत्साहात असलेल्या नागरिकांना ऐन सकाळीच वीजपुरवठा खंडित झाल्याने मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील विविध गणेश मंडळांच्या मंडपांमध्ये सकाळपासून भाविकांची वर्दळ होती. मात्र, अचानक वीज गेल्याने अनेक मंडपांमध्ये अंधाराचे वातावरण निर्माण झाले. मंडपात लावलेल्या ज्योती आणि दिव्यांच्या प्रकाशात गणरायाचे दर्शन घेण्याची वेळ नागरिकांवर आली. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उष्म्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागला. बंद पंखे आणि उकाड्यामुळे अनेक नागरिक घामाघूम झाले. वीजपुरवठा नेमका कशामुळे खंडित करण्यात आला, तो किती वेळ बंद राहणार, याबाबत नागरिकांना कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आली नाही. विशेष म्हणजे, संबंधित वीज वितरण विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोनवरूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. अशा वेळी देखभाल किंवा दुरुस्तीचे काम असल्यास त्याची पूर्वकल्पना नागरिकांना देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले. गणेशोत्सवाच्या काळात तरी वीजपुरवठ्याबाबत योग्य नियोजन करून नागरिकांना पूर्वसूचना द्यावी, अशी मागणी खांदा कॉलनीतील नागरिकांनी केली आहे.



### सेंद्रिय शेतीतून नवा आदर्श

**पाली/गोमाशी :** उमेद अभियान आणि पाणी फाउंडेशन यांच्या माध्यमातून सुधागड तालुक्यातील चिखलगाव येथील करंजाई महिला शेतकरी गटाने सेंद्रिय शेतीतून महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श घालून दिला आहे. या गटातील १२ महिलांनी एकत्र येऊन १२ एकर जमिनीवर संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने भात शेतीची यशस्वी लागवड केली आहे. रासायनिक खतांना पूर्ण फाटा देत या महिलांनी शेणखत, गांडूळ खत आणि जीवामृताचा वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्याचा यशस्वी प्रयोग केला आहे. शेतातील निंदणी, लावणी आणि मशागतीचे सर्व काम महिला स्वतः करतात. हिरव्यागार शेतात पिवळ्या साड्या परिधान करून काम करणाऱ्या या महिलांचे दृश्य सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. स्थानिक कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात असून या गटामुळे गावातील इतर बचत गटातील महिलांनाही सेंद्रिय शेतीची प्रेरणा मिळत आहे. या महिला गटाने यावर्षी गणेशोत्सव काळात गणपती डेकोरेशनमध्ये सेंद्रिय भात शेतीचा हुबेहूब मॉडेल साकारला होता. शेतातील सापळे, रोपे, सेंद्रिय निविष्ठा यांचे दर्शन घडवून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये शेतीबद्दल आवड निर्माण करणे आणि सेंद्रिय शेतीची जनजागृती करणे हा त्यामागील स्तुत्य उद्देश होता. स्वतःची जमीन नसतानाही एकत्र येऊन विषमुक्त अन्न पिकवण्याचा या महिलांचा संकल्प खरोखरच कौतुकास्पद आहे.



### उरण पतपेढीची सुवर्ण महोत्सवी सभा

**खरोशी :** शिक्षकांच्या पतपेढीची ताकद संस्थापक स्वर्गीय ह.बा. शिंदे गुरुजींच्या संकल्पनेतून निर्मित उरण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. उरणची ५०वी सुवर्ण महोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२०) बांठिया हायस्कूल नवीन पनवेल येथे संस्थेचे चेअरमन दीपक घरत यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरित्या पार पडली. या सभेकरता डॉ. सुभाष भोपी, जयदास घरत, विनोद जोशी, निर्भय म्हात्रे, बबन पाटील, प्रकाश काथारा, गंगाधर पाटील, राजेंद्र मोकल, प.ज.पाटील, महेंद्र गावंड, विकास पाटील, सुधीर डांगरकर, अजय केंद्रे, कय्युम दाखवे, प्रमोद फकीरे, दत्तात्रेय भोंडकर, हेमंत गावंड, हितेंद्र म्हात्रे, धनंजय केणी आदी मान्यवर आणि सर्व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सभासद शिक्षकांचा तसेच सेवानिवृत्त शिक्षक, संघटनचे पदाधिकारी व संस्थेचे माजी चेअरमन संचालक मंडळ आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचा पन्नास वर्षांचा सुवर्ण महोत्सवी गगन भरारी दर्शवणारा प्रवास पीपीटीच्या माध्यमातून सादर करण्यात आला. तसेच संस्थेवर कोणतेही कर्ज नसून संस्था स्वबळावर कार्यरत आहे व थकबाकीदार मुक्त असल्याचे सांगितले. सभासदांच्या वाढत्या आर्थिक गरजा लक्षात घेता सुवर्ण महोत्सवानिमित्त गृह कर्ज ५० लाख रुपये सुरू करण्याचा मानस चेअरमन घरत यांनी व्यक्त केला.

### वाजेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश



**चिरनेर :** मुंबई विद्यापीठाच्या ५९ व्या युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीत रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, फुंडे येथील विद्यार्थी प्रथमेश सदानंद म्हात्रे याने कार्टूनिंग या कला प्रकारात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दि.२१ सप्टेंबर रोजी झालेल्या अंतिम फेरीत प्रथमेश याने द्वितीय क्रमांक पटकावत रौप्यपदक प्राप्त केले. मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवातील अंतिम फेरीपर्यंत पोहोचून रौप्यपदक मिळविणे ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे. प्रथमेशच्या कल्पकतेला, कलात्मक दृष्टिकोनाला आणि सर्जनशीलतेला या यशामुळे विशेष दाद मिळाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रथमेश याचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष पी.जे. पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत, भावना घाणेकर, महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. डॉ. आमोद ठक्कर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थ्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# निवडक

## महिलांच्या आरोग्यासाठी व्याख्यानाचे आयोजन



**नेरळ** : महिलांच्या आरोग्याविषयी व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने डिकसळ येथील शांतीनगर परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विशेष आरोग्य व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. शांतीदूत मंडळ व रमाबाई महिला मंडळ, डिकसळ शांतीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्राइम मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, नेरळ येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. रोझीना काझी यांनी उपस्थित महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. डॉ. काझी यांनी मासिक पाळीतील अनियमितता, पाळीदरम्यान होणारा त्रास, स्वच्छतेची काळजी घेणे का गरजेचे आहे, यावर विशेष भर दिला. यासोबतच महिलांच्या इतर विविध शारीरिक व मानसिक आरोग्य समस्यांवर त्यांनी प्रकाश टाकला. व्याख्यानानंतर आयोजित करण्यात आलेल्या प्रश्नोत्तरांच्या सत्रात उपस्थित महिलांनी आपल्या विविध आरोग्यविषयक शंका मांडल्या, ज्यांचे डॉ. रोझीना काझी यांनी अत्यंत साध्या व सोप्या भाषेत निरसन केले. महिलांनी कुटुंबाची काळजी घेताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. कोणतीही आरोग्यविषयक समस्या उद्भवल्यास अंगावर न काढता वेळीच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि आरोग्याबाबत सतत जागरूक राहावे, असे आवाहन डॉ. काझी यांनी याप्रसंगी केले. या विशेष व्याख्यानाला शांतीनगर परिसरातील महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शांतीदूत मंडळ व रमाबाई महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## सुतारवाडीमध्ये नेटवर्कचे तीनतेरा

**सुतारवाडी** : सुतारवाडी आणि अन्य परिसरांमध्ये मोबाईलची सुविधा उपलब्ध झाली, तेव्हा येथील परिसरामध्ये अनेक मोबाईल कंपन्यांचे टॉवर होते. काही वर्ष या टॉवरने चांगली सेवा दिली. त्यामुळे हजारो कार्डधारकांनी सिम आपल्या मोबाईलमध्ये टाकले. मात्र काही वर्षानंतर नव्याने मोबाईल टॉवर उभारण्यात आले. त्यामुळे अनेक कार्डधारकांनी उभारलेल्या कंपनीचे सिम कार्ड टाकले. मात्र नव्याचे नऊ दिवस या म्हणी प्रमाणे त्या कंपनीचे टॉवर सुद्धा निकामी झाले. त्यानंतर एका नव्या कंपनीची हवा पसरली आणि असंख्य मोबाईल धारकांनी सिम पसंत करून ते सिम टाकले. या टॉवरने सुद्धा आपली करामत दाखवायला अनेक महिन्यांपासून सुरुवात केली आहे. ग्रामीण भागातील वारंवार रेंज जाणे, समोरून आलेला फोन नीट ऐकायला न येणे, वारंवार एक किंवा दोन काड्या दाखविणे, मध्येच फोन कट होणे, क्रॉस फोन लागणे अशा विविध प्रकारच्या समस्येमध्ये सिम धारक आहेत. सुतारवाडी, ढोकळेवाडी, दुरटोळी, गौळवाडी, कामत, सावरवाडी, येरळ, धागडवाडी, जामगाव, जाधव वाडी, पाथर शेत, कुडली, आंबिवली, खैरवाडी, वाळंजवाडी तसेच अन्य काही भागात रेंजचे तीनतेरा उडाले असून सिम धारक हैराण झाले आहेत. आता कोणते सिम कार्ड टाकायचे या विवंचनेत अनेक जण आहेत. मुंबई, ठाणे, गुजरात, पुणे तसेच अन्य जिल्ह्यांमध्ये हजारो जण नोकरी निमित्त गेलेले आहेत. त्यांची खुशाली ऐकणे. त्यांना महत्त्वाचे निरोप पाठविणे. अन्य ठिकाणी रक्कम ट्रान्सफर करणे या गोष्टी वारंवार ठप्प होत आहेत.



## नवी मुंबई विमानतळाच्या कार्गो सेवेला आंतरराष्ट्रीय झेप!

**पनवेल** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मालवाहतूक नेटवर्कमध्ये आणखी एका आंतरराष्ट्रीय जोडणीची भर पडली आहे. हाँगकाँग येथून तब्बल ६२ टन माल घेऊन कॅथे कार्गोचे विमान प्रथमच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले. आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीच्या दृष्टीने ही हालचाल महत्त्वपूर्ण मानली जात असून, नवी मुंबई विमानतळाची कार्गो हाताळणी क्षमता आणि आंतरराष्ट्रीय मालवाहतूक सेवा विस्तारत असल्याचे यामुळे अधोरेखित झाले आहे. हाँगकाँगसारख्या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रातून थेट मालवाहू विमानाचे आगमन झाल्याने नवी मुंबई विमानतळाच्या जागतिक कार्गो नेटवर्कमध्ये आणखी एक महत्त्वाची कडी जोडली गेली आहे. विविध देशांमधील व्यापार आणि मालवाहतुकीसाठी नवी मुंबई विमानतळाचे महत्त्व यामुळे वाढण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय मालवाहतूक कामकाज यशस्वीपणे हाताळण्याच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या वाढत्या क्षमतेचे दर्शन या कार्गो विमानाच्या आगमनातून झाले आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय कार्गो वाहतुकीच्या विस्तारासाठी ही घडामोड महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture factory as a office boy/girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 50,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321
- होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४
- अलिबाग एस.टी. स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# रायगडात मच्छिमारांवर मंदीचे सावट

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मासळी हंगामाच्या उलाढालीवर स्थानिक बाजाराची अर्थव्यवस्था अवलंबून असते. मासळी हंगामालाही नैसर्गिक बदलाबरोबरच अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या व्यवसायातही अनिश्चितता असते. मच्छिमारीला गेल्यावर अपेक्षित मासळी मिळाली नसल्यास इंधनासह अन्य खर्च वाया जातो. पर्यायाने आर्थिक नुकसानीची तीव्रता वाढते. या व्यवसायावरही पूरक व्यवसायाची साखळी असून सर्वांनाच त्याची झळ बसते. बाजाराची आर्थिक गणितेही यावर अवलंबून असल्याने एकूणच अर्थव्यवस्था विस्कळीत होत असल्याचे दिसून येते.

रायगड जिल्ह्याच्या समुद्रकिनारी भागात मासेमारी व्यवसाय चालतो. खाडीतील मासेमारीपासून अगदी खोल समुद्रातील मासेमारीपर्यंत मच्छिमारी व्यवसाय विस्तारला आहे. इंधन, देखभाल दुरुस्ती, बर्फ, पिण्याचे पाणी, जाळी, मच्छिमारांवरील खर्च ही खर्चाची साखळी आहे. नौका समुद्रात गेल्यावर पुरेशी मासळी मिळाल्यास खर्च वजा जाता हाती काही शिल्लक राहू शकते. खाडीकिनारी मासळी लिलावाच्या ठिकाणी मासळीला अपेक्षित दर मिळाल्यास मच्छिमारांच्या दृष्टीने समाधानाची बाब ठरू शकते. येथेही वाहतूकदार, विक्रेते यांनाही व्यवसायातील चढ-उताराचा सामना करण्याची वेळ येते. हा व्यवसाय तेजीत गेल्यास मच्छिमारांसह अन्य व्यवसायिकांच्या हाती समाधानकारक रक्कम असल्यास बाजारात हौशेने काही खरेदीवर भर असतो. मात्र, अलीकडील काही वर्षे या व्यवसायातही अनेक संकटांशी दोन हात करण्याची वेळ येते. जूनपासून जुलै अखेरपर्यंत मासेमारी बंदी कालावधी असतो.

यंदा त्यामध्ये १५ ऑगस्टपर्यंत वाढ केली होती. असे असले तरी काही मच्छिमार गणेशोत्सवानंतर हंगामाचा प्रारंभ करतात. त्यात पुन्हा सण-उत्सव आल्यास, नौकांच्या डागडुजीसाठी तसेच नैसर्गिक आपत्ती आल्यास मासेमारी बंद असते. अशावेळी काही मोजके महिनेच मासेमारी हंगाम चालतो. त्यातच विविध संकटे आल्यास मच्छिमारांना आर्थिक समस्यांचा सामना करण्याची वेळ येते. मासेमारीचा पूर्णतः व्यवसाय नैसर्गिक घडामोडींवर अवलंबून असतो. केवळ पावसाळी कालावधीतच धोका असतो असेही नाही, तर समुद्री वादळे कधीही येतात आणि समुद्रातील वातावरण केव्हाही बदलू शकते.

मच्छिमारी व्यवसाय बंद ठेवण्यावाचून पर्याय राहत नाही. समुद्राशी निगडित व्यवसाय असल्याने प्रत्येक दिवस मच्छिमारांना नवा अनुभव घेऊन येतो. काहीवेळा वातावरण चांगले असले तरी समुद्रातील अंतर्गत हालचालीमुळे मासे मिळणे कठीण बनते. अशावेळी मासेमारीवर खर्च करूनही अपेक्षित मासळी मिळाली नाही तर आपोआपच मिळकत कमी आणि खर्च अधिक अशी स्थिती वाढत जाते. काहीवेळा मुबलक मासळी मिळते; पण दर नाही, अशीही अवस्था निर्माण होते. याचाही फटका मच्छिमारांना सहन करावा लागतो

### इंधन दरवाढीची समस्या

अलीकडे मच्छिमारांना इंधन दरवाढीचा सामना करावा लागत आहे. यासाठी जादा रक्कम मोजावी लागते. त्यामुळे मिळणारी मासळी आणि होणारा खर्च पाहता काहीवेळा मच्छिमारांची आर्थिक ओढाताण देखील होते. मासळीचे प्रमाण घटल्यास आपोआपच त्यावरील पूरक व्यवसायही अडचणीत येतात. पर्यायाने बाजाराची साखळी मंदावते.

### सुरक्षित बंदराचा आधार

रायगड जिल्ह्यातील करंजा, रेवस- बोडणी, नवगाव, वरसोली, अलिबाग, आग्राव, कोर्लई , राजपुरी, जीवना अशी बंदरे मच्छिमारांची बलस्थाने आहेत. अनेक नैसर्गिक आपत्तीवेळी कोकण किनारी भागासह गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ राज्यातील मच्छिमारी नौका बंदरात आश्रय घेतात. हवामान पूर्ववत होईपर्यंत नौका बंदरात थांबून असतात. अलीकडील काही वर्षांत समुद्री वादळात वाढ झाल्याने समुद्रातील खराब हवामानावेळी मच्छिमारी नौका सुरक्षितता म्हणून बंदरात आश्रयाला येतात. अशा नैसर्गिक आपत्तीवेळी मच्छीमारी हंगाम थंडावतो. नौकेवरील मच्छिमारांचा खर्च सुरूच असल्याने मासळी नाही, पण खर्च सुरू अशी स्थिती असते. यामुळे मच्छिमारांना या समस्यांचा सामना करण्याची वेळ येते.




## 'दिवाळीपूर्वी मनपा कर्मचाऱ्यांना ४० हजारांचे सानुग्रह अनुदान द्या'



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेतील सर्व कामगार, कर्मचारी व अधिकारी तसेच शिक्षण मंडळ आदी विभागातील कर्मचाऱ्यांना सन २०२६ च्या दिवाळी सणापूर्वी ४० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन मंगळवारी (दि. २२) पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांना देण्यात आले. यावेळी युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, उपाध्यक्ष संजय जाधव यांच्यासह विनायक बारसे, मनोज कांबळे, रविंद्र गायकवाड, कैलास जाधव, अरुण कांबळे, भगवान राजपूत, प्रफुल्ल घरत, सन्नी बैद, वासिम पटेल, धोंडी बागडी व हर्ष बहिरा उपस्थित होते. निवेदन स्वीकारल्यानंतर महापौर नितीन पाटील यांनी कर्मचाऱ्यांच्या मागणीबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

## भास्करराव पेरे पाटील यांचे व्याख्यान

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी (गावठाण) येथील युवक मित्र मंडळाच्या वतीने यंदाच्या १२ व्या साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि.२९) सायंकाळी ६.३० वाजता करण्यात येणार असून या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील आदर्श सरपंच म्हणून ओळख असलेले भास्करराव पेरे पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमात ग्रामविकास, सामाजिक बांधिलकी आणि गावाच्या सर्वांगीण विकासाबाबत आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील हे उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

## राजिपसमोर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा उभारण्याची मागणी

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर



**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या अलिबाग येथील नव्याने उभारण्यात येत असलेल्या शासकीय इमारतीसमोर भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सुसज्ज आणि सन्मानपूर्वक अर्धपुतळा स्थापित करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले असून, या ऐतिहासिक मागणीचा सकारात्मक आणि सहानुभूतीपूर्वक विचार करून तातडीने प्रशासकीय कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी जयप्रकाश पवार (रिपाइं कोकण प्रदेश सचिव), सुनील सप्रे (रिपाइं अलिबाग मुरुड विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष), हिरामन गायकवाड (कर्जत तालुका अध्यक्ष), विजय गायकवाड (पनवेल विधानसभा अध्यक्ष), मोहनिश गायकवाड (पनवेल महानगर पालिका प्रमुख प्रभारी), प्रदीप ओव्हाळ (रायगड जिल्हा अध्यक्ष, रिपब्लिकन सेना), ॲड. रघुनाथ कांबळे, ॲड. संजय जाधव (सरचिटणीस, अलिबाग मुरुड विधानसभा सरचिटणीस रिपाइं), शंकर माने (अध्यक्ष, अलिबाग शहर) आणि बंडू मुंडे (विभाग अध्यक्ष) यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद ही ग्रामीण भागाच्या विकासातील महत्त्वाची स्थानिक स्वराज्य संस्था आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, सार्वजनिक सुविधा, महिला व बालकल्याण, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग तसेच वंचित घटकांसाठी विविध योजना राबविण्यात जिल्हा परिषदेची महत्त्वाची भूमिका आहे.

त्यामुळे सर्वसामान्य ग्रामीण जनतेशी थेट संबंध असलेल्या या शासकीय संस्थेच्या प्रशासकीय परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरणचिन्ह उभारणे अत्यंत उचित आणि प्रेरणादायी ठरेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या नव्या शासकीय इमारतीसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा उभारणे म्हणजे केवळ एका महामानवाला अभिवादन करणे नसून, संविधान, सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचा सार्वजनिक सन्मान असल्याची भूमिका निवेदनकर्त्यांनी मांडली आहे.या अर्धपुतळ्यामुळे जिल्ह्यातील नागरिक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींना बाबासाहेबांच्या विचारांची सातत्याने प्रेरणा मिळेल. शासकीय कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय, समानता आणि संविधानिक हक्कांची जाणीव करून देणारे हे प्रेरणास्थळ ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

तसेच भावी पिढ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान समजण्यास मदत होईल आणि रायगडच्या सामाजिक परिवर्तनाच्या गौरवशाली इतिहासाला अधिक सन्मान प्राप्त होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या नव्या इमारतीसमोर योग्य आणि प्रशासकीयदृष्ट्या मान्य जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सुसज्ज अर्धपुतळा उभारण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता देण्यात यावी, तसेच संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देऊन तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांचा रस्ता अडवला

### रस्ता खुला करून देण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

चांधई गावाच्या हद्दीत सरकारी निधी मधून बनवण्यात आलेला रस्ता अडवण्यात आला आहे.गेली ४० वर्ष पूर्वीपासून असलेला पारंपरिक रस्ता खुला करण्यात यावा, अशी मागणी चांधई येथील ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे. याबाबत कर्जत पोलीस निरीक्षक, कर्जत तहसीलदार तसेच कडाव मंडळ अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.



चांधई येथून नदीकडे जाणारा रस्ता सर्वे नं. २१/९ मधून गुरचरणाकडे जातो. चांधई गुरचरण सर्वे नं. ३१ हे सर्वे नं. २१/९ च्या पलीकडे असून, गुरे चारण्यासाठी पूर्वीपासून सर्वे नं. २१/९ मधून रस्ता वापरला जात होता. मात्र, १५ ऑगस्ट २०२६ पासून हा रस्ता बंद करण्यात आल्याने शेतकरी यांची गैरसोय होत आहे. सदर रस्ता हा गावाच्या रस्ते विकासाच्या नकाशामध्ये असलेला रस्ता आहे. मात्र तेथील एका शेतकऱ्यांनी हा रस्ता अडवला असून त्यामुळे आजुबाजुंच्या भागातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर नेण्याच्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. तेथील सर्वे नं. २१/९ मधील रस्त्याच्या मध्यभागी सुमारे १० फूट खोल व १५ फूट लांब खोदकाम करण्यात आले असून, त्याठिकाणी पोल टाकून रस्ता बंद करण्यात आला आहे. हा सरकारी निधी मधून बनवण्यात आलेल्या रस्त्यावर त्या व्यक्तीकडून रस्त्याच्या मध्यमभाग खड्डे खोदून खांब टाकण्यात आले आहेत. त्या ठिकाणी चांगला सुस्थितीत असलेला रस्ता खड्डे खोदल्याने खराब झाला आहे.

## सेझच्या जमिनी शेतकऱ्यांनाच परत मिळणार : हेमंत म्हात्रे

**। उरण । प्रतिनिधी ।**

महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी संपादित करण्यात आलेल्या, मात्र निर्धारित कालावधीत वापरात न आणलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळण्याचा मार्ग मोकळा होत असल्याचा दावा सेझग्रस्त शेतकरी संघटना उरण, पेण व पनवेलचे अध्यक्ष हेमंत म्हात्रे यांनी केला आहे. या जमिनी सरकारजमा न होता नियमानुसार संबंधित शेतकऱ्यांनाच परत मिळतील, असे त्यांनी सांगितले.

म्हात्रे यांनी सांगितले की, मागील सहा वर्षांपासून संघटनेच्या माध्यमातून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरू आहे. कुळकायदा अन्वये महामुंबई सेझसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनी कंपनीने १५ वर्षांच्या कालावधीत वापरल्या नसल्याने सुमारे १२०० शेतकऱ्यांनी ॲड. दत्तात्रेय नवाळे यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे जमिनी परत मिळण्यासाठी चौकशी अर्ज दाखल केले आहेत. या प्रकरणाची अंतिम सुनावणी पूर्ण झाली असून निकालाची प्रतीक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पेण तालुक्याचे आमदार रवींद्र पाटील यांनी सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महसूल मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात दोन बैठका आयोजित केल्या होत्या. या बैठकीत १५ वर्षे जमीन वापरात न आणल्याच्या प्रकरणांमध्ये नियमानुसार जमिनी परत देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे म्हात्रे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी, रायगड यांनी २९ जुलै २०२६ रोजी महसूल व वन विभागाला पाठविलेल्या अहवालात, संपादित जमिनींच्या बदल्यात पुनर्वसनाचे लाभ शेतकऱ्यांना देण्यात आले नसल्याने संबंधित जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केल्याचा दावा करण्यात आला आहे. उरण, पेण व पनवेल तालुक्यातील सेझसाठी संपादित झालेल्या जमिनींबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शेतकऱ्यांच्या भूमिकेला बळ देणारा असल्याचे ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी सांगितले.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाची प्रतीक्षा

या प्रश्नावर संघटनेने दीर्घकाळ पाठपुरावा केल्यानंतर आता काही राजकीय मंडळी श्रेय घेण्यासाठी बैठका व मोर्चे काढत आहेत. सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना नियमानुसार परत मिळाव्यात, हीच आमची प्रमुख मागणी आहे. या प्रकरणाची अंतिम सुनावणी जिल्हाधिकारी रायगड यांच्या दालनात पूर्ण झाली असून निकालाची प्रतीक्षा लागली आहे.

## भवानी नडगांव ग्रामस्थ मंडळाची नवी कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी प्रकाश अगबूल यांची बिनविरोध निवड

**। महाड । प्रतिनिधी ।**

भवानी नडगांव ग्रामस्थ, मुंबई, तरुण मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. या विशेष प्रसंगी ज्येष्ठ ग्रामस्थ, मुंबई मंडळ आणि तरुण मित्र मंडळाच्या मोठ्या संख्येतील उपस्थितीत आगामी पाच वर्षांच्या कालावधीसाठी ग्रामस्थ मंडळाच्या नव्या कार्यकारिणीची सर्वानुमते आणि बिनविरोध निवड करण्यात आली.

यामध्ये मंडळाच्या अध्यक्षपदी प्रकाश अगबूल, सेक्रेटरीपदी संतोष कीजबिले, खजिनदारपदी अनिल कीजबिले उपाध्यक्षपदी अशोक दवंडे, राजन बैकर व अजय अगबूल, उपसेक्रेटरीपदी संतोष आटले, सुरेश नगरकर व निखिल दवंडे, उपखजिनदारपदी विवेक कीजबिले यांची बिनविरोध निवड झाली. अनुभवी मार्गदर्शन लाभण्यासाठी रामू दवंडे, कृष्णा मोरे, मारुती दवंडे, तुकाराम घुरुप, दत्ताराम मोरे व दत्ताराम करजीवकर या ग्रामस्थांचा सल्लागार मंडळात समावेश करण्यात आला आहे.

**महामार्ग पोलिसांच्या उपाययोजनांना यश | बेशिस्त चालकांवर कारवाईचा धडाका**

## बोरघाटात ११२ दिवस मृत्यूविरहित प्रवास

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाट परिसरात अपघात प्रतिबंधासाठी महामार्ग पोलिसांनी राबविलेल्या उपाययोजनांना सकारात्मक परिणाम मिळाला आहे. बोरघाट महामार्ग पोलीस केंद्राच्या हद्दीत तब्बल ११२ दिवसांचा मृत्यूविरहित कालावधी नोंदविण्यात आला आहे.

अपर पोलीस महासंचालक प्रविण साळुंके, रायगड परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक तिरुपती काकडे, पोलीस उपअधीक्षक पुष्पलता दिघे आणि पोलीस निरीक्षक भरत शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल पाटील यांच्या माध्यमातून उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

वेगमर्यादेचे पालन, सुरक्षित अंतर, धोकादायक ओव्हरटेक टाळणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे आणि सीट बेल्टचा वापर याबाबत वाहनचालकांचे सातत्याने प्रबोधन केले जात आहे. त्याचवेळी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जात आहे.

जुलै २०२६ मध्ये ६,८७६, तर ऑगस्ट २०२६ मध्ये ९,७८३ कारवाया करण्यात आल्या. जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या चालकांविरोधात ९४ प्रकरणात कारवाई करण्यात आली.

बोरघाटासारख्या संवेदनशील महामार्गावर ११२ दिवस प्राणांतिक अपघात न होणे ही अपघात प्रतिबंधाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद आहे. पेट्रोलिंग, रात्रगस्त, सूचना फलक, वाहतूक नियमन, वाहनचालकांचे प्रबोधन आणि नियमभंगावरील कारवाई या सर्व उपाययोजनांच्या एकत्रित प्रयत्नातून हा परिणाम साध्य झाल्याचे दिसून येते. महामार्गाची सुरक्षितता केवळ पोलिस यंत्रणेच्या उपाययोजनांवर अवलंबून नसून वाहनचालकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. वेगावर नियंत्रण, सुरक्षित अंतर, लेन शिस्त, योग्य पद्धतीने ओव्हरटेक आणि वाहन चालविताना पूर्ण एकाग्रता यांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण आणखी कमी करण्यास मदत होऊ शकते.

### रात्रगस्तीसह नियमित पेट्रोलिंग

महामार्गावरील वाहतूक सुरक्षित व सुरळीत राहण्यासाठी रात्रगस्त आणि नियमित पेट्रोलिंग वाढविण्यात आले आहे. वाहनांची तपासणी, वाहतूक नियमांचे उल्लंघन तसेच महामार्गावरील संभाव्य अडथळ्यांवर पोलिसांचे विशेष लक्ष आहे. अपघात किंवा वाहतुकीत अडथळा निर्माण झाल्यास तातडीने घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत करण्यासोबतच अपघातग्रस्तांना मदत केली जात आहे.

### धोकादायक ठिकाणांवर विशेष लक्ष

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक आणि संवेदनशील ठिकाणांची निश्चिती करून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. वाहनचालकांना संभाव्य धोके लक्षात यावेत यासाठी सूचना व सावधानतेचे फलक लावण्यात आले असून, महत्त्वाच्या ठिकाणी फिक्स पॉईंट निश्चित करून वाहतुकीवर लक्ष ठेवले जात आहे. ब्लॅकस्पॉटच्या ठिकाणीही वाहनचालकांना सतर्क करण्यावर भर देण्यात आला आहे.



# गणेश दर्शन स्पर्धा २०२६




● श्री. अनिरुद्ध संदीप खेडेकर यांच्या घरी विराजमान झालेली गणेशमूर्ती सजावट संकल्पना : राजपुताना झरोका शैली-लाकडातील स्थापत्य वारसा. पत्ता: मु.पो.नांदगाव, ता.मुरुड,जि.रायगड




● प्रथमेश दत्ताराम पाटील, मु.दिवी पारंगी ता. अलिबाग, जि. रायगड, महाराष्ट्र (चलचित्र देखावा ग्रामीण व शेती जीवन)



● श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ यांचे इथली श्री गणरायाची मनमोहक सजावट.
(छायाचित्र- सुरेश खडपे)



● श्री. संजय मनोहर पोईलकर सहाण यांनी अश्वावर आरुढ गणेशाची भव्य मूर्ती. (छायाचित्र- सुरेश खडपे)



● श्री.वसंत धर्मा घरत ओमकार फ्रेंड सर्कल वरसोली, तालुका-अलिबाग, रायगड
● मूर्तीकार-श्याम घरात, वरसोली



● आंबा बागाईतदार व अलिबाग तालुका आंबा बागाईदारांच्या सहकारी खरेदी विक्री संस्थेचे सदस्य नरेश जनार्दन पाटील, चिंचवली यांच्या घरातील श्री गणेशाची आकर्षक मूर्ती.

# भारताला विजयासाठी जपानने झुंजवले

## || पाच षटकात ३३ धावांचे लक्ष्य || अवघ्या २ धावांनी जिंकला सामना

| सानो (जपान)| वृत्तसंस्था |

भारत विरुद्ध जपान पुरुष संघांमध्ये एकमेव टी-२० सामना मंगळवारी सानो आंतरराष्ट्रीय क्रिकेट ग्राऊंडवर झाला. अत्यंत रोमांचक झालेल्या या सामन्यात भारताने फक्त २ धावांनी विजय मिळवला. भारताने पहिल्यांदाच जपानमध्ये खेळताना हा विजय मिळवला. त्यामुळे हा विजय खास ठरला.

भारत आणि जपान यांच्यातील राजनैतिक संबंधांना ७५ वर्षे होत असल्यामुळे आयोजित करण्यात आलेल्या या सामन्याला सुझुकी कप असे नाव देण्यात आले आहे. मात्र, सानोमध्ये मंगळवारी पाऊस झाल्याने हा सामना ५-५ षटकांचाच करण्यात आला होता.



या सामन्यात भारताने ५ षटकात जपानसमोर ३३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना जपानला ५ षटकात ३ बाद ३० धावाच करता आल्या. या सामन्यात श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ५-५ षटकांच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणारा श्रेयस पूर्ण सदस्य असलेल्या संघांमधील पहिलाच कर्णधार ठरला आहे.

दरम्यान, प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली होती. भारताने पहिल्या दोन षटकातच दोन्ही सलामीवीरांना गमावले. पहिल्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर स्ट्राईकवर आलेल्या अभिषेक शर्माला १७ वर्षांच्या चार्ली हारा-हिंजे याने शोमा सुगाया-स्लॅटरच्या हातून झेलबाद केले. अभिषेक भोपळाही फोडता आलेला नाही. दुसऱ्या षटकात संजू सॅमसनलाही इब्राहिम ताकाहाशीने ९ धावांवरच बाद केले.

इतकंच नाही, तर इशान किशनही ३ धावांवरच माघारी परतला. त्याला बेंजामिन इटो-डेव्हिसने ३ धावांवर माघारी धाडले. त्यामुळे ३ षटकात ३ बाद १४ धावा अशी बिकट अवस्था भारतीय संघाची झाली होती. पण अखेरच्या दोन षटकात श्रेयस अय्यरने डाव सांभाळला, पण तो शेवटचा एक चेंडू बाकी असताना बाद झाला. त्याला चार्ली हारा-हिंजेनेच १२ चेंडूत १६ धावांवर बाद केले. त्यामुळे भारताला ५ षटकात ४ बाद ३२ धावा करता आल्या होत्या. तिलक वर्मा १ धावेवर नाबाद राहिला. भारताकडून ३० चेंडूत फक्त दोन चौकार मारले गेले. तसेच एकही षटकात भारतीय फलंदाजांना मारता आला नाही.

भारतीय फलंदाजांची निराशाजनक कामगिरी राहिली असली, तरी गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली आहे. पहिल्या षटकात लछलान यामामोटो-लेकला १ धावेवर इशान किशनने धावबाद केले. त्याच्या पुढच्याच षटकात वॉशिंग्टन सुंदरने रवी बिश्नोईच्या हातून इब्राहिम ताकाहाशीला ४ धावांवर झेलबाद करत माघारी धाडले.

तिसऱ्या षटकात रवी बिश्नोईच्या गोलंदाजीवर १० धावा निघाल्या. कर्णधार केंडल काडोवाकी-फ्लेमिंगने आक्रमक खेळ केला. पण त्याला चौथ्या षटकात वॉशिंग्टन सुंदरने १२ धावांवर बाद केले. त्यामुळे ६ चेंडूत ८ धावा असे जपानसमोर समीकरण होते. पण अखेर अक्षर पटेलने ५ धावाच दिल्या. त्यामुळे भारताने हा सामना जिंकला.

# झहीरच्या हाती चेन्नईची सूत्रे

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खान चेन्नई सुपर किंग्स संघाचा मुख्य प्रशिक्षक बनला आहे. सीएसकेने सोशल मीडियाद्वारे त्याच्या नियुक्तीची घोषणा केली आहे. २०२६ च्या आयपीएल हंगामानंतर मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिलेल्या स्टीफन फ्लेमिंग यांची जागा झहीर घेणार आहे. सीएसके आणि स्टीफन फ्लेमिंग यांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला. आणि यानंतर चेन्नईने झहीरची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.



फ्लेमिंग यांनी दीर्घकाळ सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहिले, परंतु २०२६ च्या आयपीएल हंगामाच्या काही महिन्यांतच त्यांनी संघ सोडण्याचा निर्णय घेतला. एक क्रिकेटपटू म्हणून, झहीरने १०० आयपीएल सामने खेळले आणि २७.२७ च्या सरासरीने १०२ बळी घेतले. हा त्यांच्या शानदार भारतीय कारकिर्दीचा एक भाग होता. त्यांनी सर्व फॉरमॅटमध्ये मिळून एकूण ६१० बळी घेतले आहेत.

# पीएनपी माध्यमिक बीड बु. शाळेची क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

■ टेबल टेनिसमध्ये जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय क्रमांक
■ कुस्तीत केतकी लोभी प्रथम

| अलिबाग | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यांत (दि. २१) सप्टेंबर रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत पीएनपी माध्यमिक बीड बु. कर्जत शाळेच्या मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. शाळेच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हास्तरावर शाळेचे नाव उंचावले. तसेच तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत केतकी शिवाजी लोभी हिने प्रथम क्रमांक मिळवत दमदार कामगिरी केली. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने तिचे विशेष अभिनंदन करण्यात आले.



या यशामध्ये विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका नीलम मिसाळ व ममता पाटील यांचेही मोलाचे योगदान लाभले.

शाळेतील विजेते खेळाडू तसेच मार्गदर्शक शिक्षिकांचे संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, शाळेचे मुख्याध्यापक राजाभाऊ गाडेकर, शाळा समितिचे चेअरमन व सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात मिळवलेल्या या यशामुळे पीएनपी माध्यमिक बीड बु. शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेकडून दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनाचे हे फलित असल्याचे मत मुख्याध्यापक राजाभाऊ गाडेकर यांनी व्यक्त केले आहे.

# अबॅकस स्पर्धेत हिरण्याचा प्रथम क्रमांक

| म्हसळा | प्रतिनिधी |

एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनमध्ये म्हसळा येथील विद्यार्थिनी कु. हिरण्या सुशांत लाड हिने तब्बल १,५०० विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. हिरण्या ही इयत्ता दुसरीत शिक्षण घेत असून, तिच्या या यशामुळे म्हसळा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ही राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस परीक्षा पनवेल येथील बँक्वेट हॉलमध्ये घेण्यात आली. देशभरातून सहभागी झालेल्या सुमारे १,५०० विद्यार्थ्यांमध्ये आपल्या गणिती कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत हिरण्या लाड हिने प्रथम क्रमांक मिळविला. लहान वयात मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.




अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गणिती कौशल्य, एकाग्रता, आकलनशक्ती आणि जलद गणना करण्याची क्षमता विकसित होत असते. या कौशल्यांचा उपयोग करत हिरण्या व प्रार्थना यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. हिरण्या लाड हिच्या प्रथम क्रमांकाच्या यशाबद्दल तसेच प्रार्थना लाड हिला मिळालेल्या 'एक्सलंट ट्रॉफी'बद्दल पालक, शिक्षक, अबॅकस अकॅडमीचे मार्गदर्शक आणि मित्रपरिवाराकडून दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# जोकोविच चायना ओपनसाठी सज्ज

| बीजिंग | वृत्तसंस्था |

सर्बियन टेनिसपटू नोव्हाक जोकोविचने आगामी चायना ओपनमध्ये सहभागी होणार आहे. ही एटीपी-५०० स्पर्धा २८ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर दरम्यान बीजिंगमध्ये होणार आहे. जोकोविच ११ वर्षांनंतर या स्पर्धेत पुनरागमन करणार आहे.



जागतिक क्रमवारीत अव्वल असलेला यानिक सिनर आणि नुकताच यूएस ओपन विजेता ठरलेला अलेक्झांडर झ्वेरेव्ह हे देखील चायना ओपनमध्ये सहभागी होणार आहे.

# कर्जत तालुक्यात पावसाळी क्रीडा स्पर्धा सुरु

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या पावसाळी क्रीडा स्पर्धा सुरु झाल्या आहेत.पावसाळी क्रीडा स्पर्धेला चिंचवली डिकसळ येथील भाऊसाहेब राऊत विद्यालयात क्रीडा ज्योत प्रज्वलित करून झाली. ३१ सप्टेंबरपर्यंत पावसाळी क्रीडा स्पर्धा चालणार असून विविध १० क्रीडा प्रकारात तीन गटात या क्रीडा स्पर्धा तालुक्यातील विविध ठिकाणी खेळविल्या जाणार आहेत.



रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अलिबाग व पंचायत समिती शिक्षण विभाग, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय क्रीडा स्पर्धा सन २०२६-२७ चे उद्घाटन भाऊसाहेब राऊत विद्यालय, चिंचवली डिकसळ येथे झाले. यावेळी तालुका क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ क्रीडा ज्योत प्रज्वलित नमिता श्रीखंडे यांच्या हस्ते करुन झाला. यावेळी तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, नमिता घारे, चित्रा ठाकरे उपस्थित होते. यांच्यासह तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील, समीर येरुणकर आदी उपस्थित होते.

या वर्षी २१ ते ३१ सप्टेंबर या कालावधीत पावसाळी क्रीडा महोत्सव तालुक्यातील विविध ठिकणी आयोजित केला आहे. यावर्षी तालुक्यातील शालेय स्तरावरील साधारण १० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग राहण्याची शकयता वर्तवण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात दरवर्षी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये जवळपास १० हजार विद्यार्थी सहभागी होतात. तालुका स्तरापासून जिल्हा, विभाग व राष्ट्रीय स्तरापर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे.

या पावसाळी क्रीडा महोत्सव खो खो, कबड्डी, मैदानी खेळ, व्हॉलीबॉल तसेच कॅरम, बुद्धिबळ, करते, कुस्ती, योगासन अशा इनडोअर स्पर्धा देखील खेळविल्या जाणार आहेत. या सर्व स्पर्धा १४ वर्षाखालील, १६ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील अशा तीन गटात मुले आणि मुली अशा स्वरूपात केहलवाल्या जाणार आहेत. यावर्षी पावसाळी क्रीडा स्पर्धा भाऊसाहेब राऊत विद्यालय चिंचवली डिकसळ, माथेरान व्हॅली स्कुल वंजारपाडा, शार्विल स्कुल नेरळ, अभिनव ज्ञान मंदिर कर्जत, दिलकॅप स्कुल ममदापुर, गीता घारे स्कुल खांडपे, सुंदर स्कुल पोसरी, बॅटमिंटन कोर्ट तमनाथ, अशा ठिकाणी होणार आहेत.

क्रीडा स्पर्धांचे नियोजन तालुका शिक्षण विभागाचे वतीने विस्तार अधिकारी अरुण पारधी, तालुका गट समन्वयक प्रदीप सुर्वे, केंद्रप्रमुख मंदार रसाळ, बाबासाहेब पालवे, महेश खाडे, शशिकांत पालकर,आनंद कराळे,भाऊसाहेब खेमनार,राजेंद्र शिंदे, नाथराव जाधव, संजय देशमुख, मोहन पाटील,आदी उपस्थित होते.

## जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी

# भारतीय विद्यार्थी-खेळाडू सज्ज

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

जपानमधील आइची-नागोया येथे होणाऱ्या २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये मलव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीफ्चे ५८ विद्यार्थी-खेळाडू भारताचे प्रतिनिधित्व करत आहेत. विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीशील प्रवासातील हा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत भारताच्या एकूण ५०३ खेळाडूंच्या पथकापैकी सुमारे ११% खेळाडू डझण चे आहेत आणि ते १५ विविध क्रीडा प्रकारांत सहभागी होत आहेत.

तिरंदाजीत तनिपार्थी चिकिता, क्रिकेटमधील इशान किशन, नेमबाजीतील एलावेनिल वलारिवन आणि नीरू, तिरंदाजीतील बोम्मादेवरा धीरज, बॉक्सिंगमधील प्रीती, अॅथलेटिक्स धर्मवीर चौधरी, हॉकी हरमनप्रीत सिंग यांचा समावेश आहे. चिकिता भारताच्या महिला कंपाऊंड तिरंदाजी संघाचा भाग आहे, तर धीरज बोम्मादेवरा पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात स्पर्धा करत आहे; इशान किशन भारताच्या पुरुष क्रिकेट संघाचा भाग आहे आणि एलावेनिल वलारिवन व नीरू यांचा भारताच्या नेमबाजी पथकात समावेश आहे.

खेळाडूंना व्यावसायिक प्रशिक्षण आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच उच्च-स्तरीय क्रीडा कामगिरीसोबतच शिक्षण सुरू ठेवण्याची लवचिकता देणे असा या विद्यापीठाचा कार्यक्रम आहे. भारताचे क्रीडा भविष्य बळकट करण्यात विद्यापीठे निर्णायक भूमिका बजावू शकतात.

५८ खेळाडू १५ विविध वेडा प्रकारात असे सहभागी होतील. कॅनोईंग आणि कयाकिंग (१०), नेमबाजी (९), हॉकी (८), कुस्ती (७), रोईंग (६), तिरंदाजी (५), थलेटिक्स (३), बॉक्सिंग (३), जलतरण (१), बॅडमिंटन (१), क्रिकेट (१), वेटलिफ्टिंग (१), कराटे (१), रग्बी (१) आणि वुशू (१) या खेळांचा समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)